# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१६/२००९.

श्री. उमेश प्रल्हाद लोखंडे,
रा. श्रावस्तीनगर (वडपाखळ),
जरीपटका, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रामदास आगवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. हट्टेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर यांचे कार्यालयाकडे नगर भुमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर यांचेकडून मौजा सोमलवाडा न.भु.क्र.५१३, सिट क्र. ६८२/२७, खसरा क्र. ६५/४ या जागेची पोटहिस्सा मोजणी दिनांक १६.२.२००५ ते १८.२.२००५ रोजी झालेली आहे त्यानुसार येणेप्रमाणे माहितीची सत्यप्रत मिळण्यात यावी. येथील प्रत्येक प्लॉटला वेगवेगळा सिटी सर्व्हे नं. दिलेला आहे. यामधील सिटी सर्व्हे नं. ५१३/६ व ची मोजणी नकाशा क प्रत व आखीव पत्रिकाची सत्यप्रत मिळण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.

अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.८.२००९ रोजी आपण मोजणी मामला क्रमांकाची नोंद आपल्या अर्जात केलेली नाही. त्यामुळे आपल्या अर्जानुसार पुढील कार्यवाही करता येत नाही. आवश्यक असल्यास आपण नमूद नगर भूमापन क्रमांकाच्या पुर्वी आलेल्या पोटहिस्सा झालेल्या नकाशाचे समक्ष अवलोकन करावे. त्यानंतर नियमानुसार आपणास नकाशाची प्रत पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १.१०.२००९ रोजी देण्यात आला असून मागणी केलेली माहिती नियमानुसार योग्य फीचा भरणा करुन नक्कल घ्यावी. त्यानंतर दिनांक २१.११.२००९ रोजी मौजा सोमलवाडा येथील ख.क्र. ६५/४ व ६२/११ मधील नगर भुमापन क्रमांक ५१३ ची मोजणी नकाशाची क प्रत आपणास अति सत्वर आवश्यक असल्यास शासकीय फीचा भरणा करुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये मोजणी मामला क्रमांक दिला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी याी सुध्दा असे सांगितले की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम ४(अ) प्रमाणे नकाशाची प्रत किंवा क प्रत पाहिजे असल्यास विभागाने ठरविलेली फी भरणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी फी भरलेली नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही व आता अशी प्रवृत्ती वाढत चालली आहे की, फी भरायची नाही व कोणतीही माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावयाची. माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना कळविले होते. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे. त्यामुळे फी भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१९/२००९.**

श्रीमती माला गंगाधर मानकर,
रा. खैरी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, कामठी,
जि. नागपूर.

श्री. व्ही. वाय. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, खैरी,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. गुणवंत पंखराज, कनिष्ठ अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १०.७.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत खैरी, ता.कामठी, जि. नागपूर यांचेकडे श्री. गणपत माधोजी कानफाडे, रा. खैरी, ता. कामठी मुळ जागेचे मालक बळीराम मानकर यांची जागा याची व लांबी रुंदी सह एकूण क्षेत्रफळ व जागेची रजिष्ट्री व नकाशा मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.७.२००९ रोजी सचिव तथा माहिती अधिकारी यांनी सदर व्यक्तीचे कडून रजिष्ट्रीची कॉपी मागण्याबाबत नोटीस पाठविण्यात येईल. सदर रजिष्ट्री प्राप्त

... २

झाल्या बरोबर आपणास माहिती पुरविण्यात येईल असा शेरा दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक १०.७.२००९ रोजी श्री. गणपत माधोजी कानफाडे यांना पत्र सचिव, ग्राम पंचायत खैरी यांनी दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३०.११.२००९ रोजी अपीलकर्ती यांना विक्रीपत्राची प्रत मागितलेली आहे. परंतु त्यांनी अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झ ाली नसल्यामुळे व कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ती यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ७.९.२००९ रोजी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, कामठी यांनी माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणीपण घेण्यात आलेली दिसून येते. दिनांक १२.१०.२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. परत एकदा लेखी पत्र देऊन माहिती मागवाी असे ठरले व याला दोन्ही पक्ष सहमत झाल्यामुळे परत एकदा माहिती मागविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे सदरची चुकीची लांबी रुंदी आराजी उपलब्ध नाही. तसेच विक्रीपत्र सुध्दा उपलब्ध नाही. नमुना ८ मध्ये क्षेत्रफळ असते. परंतु सदरच्या ग्रामपंचायतच्या कागदपत्रामध्ये ती माहिती उपलब्ध नाही त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु आता रुपये २० चा स्टॅम्प फी ची खरेदी विक्री झाली होती त्याची प्रत मिळाली आहे व ती अपीलकर्ती यांना दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरचे विक्री त्यांना मान्य नाही. परंतु माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते. त्यामुळे स्वतंत्रपणे तक्रार मुंबई ग्रामपंचायत नियामाप्रमाणे करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२०/२००९.**

श्री. संजय मुकींदाजी चिंचखेडे,
मु. पो. कोहळी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (बांधकाम)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. पी. एस. भगत,
जनमाहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२००९ रोजी जावक क्रमांक/पंसक/उपसभापती/९८४/२००९, कार्यालय पंचायत समिती, कळमेश्वर, दिनांक २६.३.२००९ चे दाखल केलेल्या पत्रान्वये चौकशी अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितलेला दिसून येतो. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.६.२००९ रोजी संबंधित मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी (बांधकाम) यांचेशी संबंधित असल्यामुळे संबंधित अर्ज हा हस्तातर करुन अपीलकर्ता यांना त्याची प्रत दिलेली आहे. बांधकाम विभागाने दिनांक १६.७.२००९ रोजी तक्रार प्राप्त झाली नाही व त्यामुळे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून

... २

येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.१०.२००९ रोजी देण्यात आला असून चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशीच्या अहवालाची सत्यप्रत अपीलकर्ता अर्जदारास ७ दिवसांत अहवाल उपलब्ध करुन देता येईल असा आदेश दिलेला आहे. परंतु त्यानंतरही चौकशी अहवाल उपलब्ध झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अद्यापही तक्रारीची चौकशी झाली नाही व त्यामुळे सदरचा अहवाल उपलब्ध करुन देता येत नाही असे असल्यास अपीलकर्ता यांना चौकशी झ ाल्यावर अहवाल उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना तक्रारीची चौकशी झाल्यावर ७ दिवसांचे आंत अहवाल उपलब्ध करुन द्यावा. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. परंतु त्याबद्यलची दक्षता ही जनमाहिती अधिकारी यांनी घ्यावयाची असून सदरचा अहवाल उपलब्ध करुन द्यावा अन्यथा जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१७/२००९.**

श्री. रशिद मुसा हैदर,
८०४/१५, हैदर इस्टेट,
मेहंदीबाग रोड, खैरीपूरा,
नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रामदास आगवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. जे. एन. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक - १,
मुस्लीम लायब्ररीजवळ, सदर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी सिटी सर्व्हे तथा माहिती अधिकारी नंबर १, नागपूर यांचेकडे सिट नं. १०८, न.भु.क्र. ३४७ दिनांक ३०.१०.२००४ मोजणी मामला ३२/२००४ मौजा नागपूर याबद्यल दोन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००९ रोजी क प्रत उपलब्ध असून फीचा भरणा करुन घेऊन जावे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर अपीलकर्ता यांनी फीचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी

... २

असे कळविलेले दिसून येते. दिनांक ४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती त्यांचे सहीने न देता कनिष्ठाचे सहिने दिलेली असल्यामुळे नगर भुमापन अधिकारी क्रमांक १, नागपूर यांचेकडे परत पाठविण्यात आले. त्यानंतर दिनांक १७.९.२००९ रोजी आक्षेप घेतलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी आखीव पत्रिकाची फी भरुन माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे क प्रत पुर्वी सुध्दा उपलब्ध होती. परंतु त्यांनी जी माहिती मागितली होती ती माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे जी माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते. एखाद्या प्रकरणात कार्यवाही का केली नाही त्याबाबत जनमाहिती अधिकारी हे काहीही सांगू शकत नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये सन २००४ मध्ये नोंद कां करण्यात आली नाही वगैरे माहिती ही उपलब्ध करुन देता येत नाही. माहिती अधिकारी हे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहेत. कोणत्याही प्रकरणात मत देणे हे अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३७/२००९.**

श्री. विद्यासागर कालीदास कासलीवार,
मु. पो. ता. सिरोंचा, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सिरोंचा,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने श्री. ए. बी. बावणे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, सिरोंचा यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती अपीलकर्ता यांना दिनांक ३.२.२००९ रोजी स्वतः कार्यालयात जाऊन प्राप्त करुन घेतलो. मागितलेली माहिती मला प्राप्त झालेली आहे व माझे समाधान झालेले आहे अशी पावती जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी दिनांक १८.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगास सादर केलेली आहे. तसेच संबंधितास माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यासाठी विनंती आहे. तसेच माहिती न मिळाल्याबाबत तक्रार आल्यास मी जबाबदार राहीन असे निवेदन जनमाहिती अधिकारी यांनी सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३९/२००९.**

श्री. महेश चैतराम पाली,
३६६, टॉंगा स्टॅन्ड, धरमपेठ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
आकोट, जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
आकोट, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. व्ही. एस. तोटे, नायब तहसीलदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, आकोट यांचेकडे एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने मिळाली आणि माझे समाधान झाले म्हणून आपले अपील अर्ज मागे घेत आहे. याकरिता सदरचे प्रकरण आपल्या स्तरावर नस्तीबध्द करण्यात यावे अशी विनंती राज्य माहिती आयोगास दिनांक १८.१२.२००९ रोजी लेखी निवेदन देऊन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४५/२००९.**

श्री. खुशाल पांडुरंग बांबोळे,
रा. वेलतूर तुकूम, पो. वाघोली,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. जे. सातार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी ,
पंचायत समिती, चामोर्शी,
जि. गडचिरोली.

कु. के. डी. कोडापे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय वेलतूर तुकूम,
पो. वाघोली, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याची सूट देऊन माहिती मिळण्याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे त्यामुळे ते गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, वेलतूर, तुकूम यांचेकडे एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती अपीलकर्ता यांना दिनांक ४.१२.२००९ ला दिलेली आहे. त्यांनी माहिती बाबत कोणतीही तक्रार नाही असे निवेदन दिले आहे.

... २

भविष्यात त्यांनी सदर माहितीची मागणी केल्यास जनमाहिती अधिकारी म्हणून मी ती माहिती देण्यास बंधनकारक असेन असे जनमाहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास खुलासा दिलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी दिनांक ३०.११.२००९ चे पत्र मला प्राप्त झाले व दिनांक १४.४.२००९ अन्वये माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली संपूर्ण माहिती मला प्राप्त झाली. यात माझी काहीही उजर तक्रार नाही. करिता सबब पोच पावती लिहून देत आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५३/२००९.**

श्री. मोरेश्वर बळीराम धोटे,
रा. वेलतूर तुकूम, पो. वाघोली,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली - ४४२ ६०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. जे. सातार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी ,
पंचायत समिती, चामोर्शी,
जि. गडचिरोली.

श्री. एल. बी. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत समिती, चामोर्शी,
जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत समिती, चामोर्शी यांचेकडे देविदास सोमा देशमुख यांच्या घरकुलाचे संदर्भातील माहिती नोंदणी डाकेने मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १६.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु

माहिती घेण्यास नकार दर्शविले अशी नोंद दिसून येते व त्यामुळे दिनांक २.१२.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती पोष्टाने पाठविण्यात आलेली आहे असे दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००९ रोजी माहिती मागितली ती ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व जनमाहिती अधिकारी यांचे सांगण्यावरुन दिसून येते. त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती त्यांना ३० दिवसांचे आत देणे आवश्यक असते यांची त्यांना जाणीव होईल याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.८.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसाचे आंत विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी करावयाची आहे त्यामुळे त्यांचेकडे स्वतंत्रपणे निर्णयाची एक प्रत पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४०/२००९.**

श्रीमती शिला अशोक रामटेके,
मु. पो. नवखळा, ता. नागभिड,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. जी एन. करलुके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
नागभिड, जि. चंद्रपूर.

श्री. पी. एस. जनबंधु,
जनमाहिती अधिकारी तथा
राजस्व मंडळ अधिकारी,
तहसील कार्यालय, नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १७.८.२००८ रोजी आराजी १.१२ हेक्टरचे फेरफार घेणे आवश्यक आहे. गट नं. २११ फे. क्र. ४८२, दिनांक ११.३.१९९६ नुसार फेरफार घेण्याबाबत. लाभार्थीला शासकीय लाभ मिळत नसल्यामुळे फेरफार घेणे आवश्यक आहे अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ८.९.२००९ रोजी मंडळ अधिकारी, नागभिड यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.१०.२००९ रोजी देण्यात आला असून तहसीलदार

तथा प्रथम अपीलीय अधिकारी, नागभिड या निष्कर्षावर पोहचलो आहे की, मौजा नवखळा येथील गट २११, आराजी ०.७३ हे.आर. संयुक्त खात्यावर शेतजमीन आहे. तसेच सदर जमीन अपीलार्थीने वसंत काशीनाथ मेश्राम यांचेकडून विकत घेतली असल्यामुळे सदर सर्व्हे नंबर मध्ये मूळ शेत मालक मृत्यू पावल्यामुळे त्यांचे वारसाची नांवे प्रथम ७/१२ ला असून त्यानंतर अपीलार्थीचे नांव क्रमांक २ वर आहे. गट नंबरचे क्षेत्र एकूण ०.७३ हे.आर असल्यामुळे व सदर क्षेत्र ०.८० हे.आर पेक्षा कमी असल्यामुळे विभागणी करता येत नाही. असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ती यांना प्रत्यक्षात काय अपेक्षित आहे हे त्यांचे अर्जावरुन स्पष्ट होत नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचे सुनावणीकरिता तहसीलदार यांनी प्रथम अपीलात स्पष्टपणे निर्णय दिलेला आहे व तसे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले त्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ती यांना त्यांच्या क्षेत्रफळाबद्यलची तक्रार असल्यास त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे अंतर्गत उपविभागीय अधिकारी, महसूल यांचेकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. मात्र अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १८.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४१/२००९.**

श्रीमती संगिता एस. मडावी,
ग्रामीण रुग्णालय परिसर चिचगड,
ता. देवरी, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. डी. एस. लोहबरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
जिल्हा आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दिनांक ३०.६.२००९ ला घेण्यात आलेल्या आरोग्य सेविका पदाच्या नियुक्तीकरिता हे आलेल्या बंधपत्रित उमेदवारांच्या मुलाखतीबद्यल दिनांक २६.६.२००९ ते दिनांक २.७.२००९ ची प्राप्त झालेल्या आदेशाची स्पष्ट छायांप्रत व घेतलेल्या निर्णयाची लेखी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ३०.६.२००९ ला ठेवण्यात आलेल्या मुलाखती बद्यल माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे

... २

समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.१०.२००९ रोजी देण्यात आला असून आपण फॅक्स करुन सुनावणीस उपस्थित राहत नसल्याचे कळविले आहे. तसेच योग्य ती माहिती देण्याबाबतही कळविले आहे. त्यामुळे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कार्यालय जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी दिलेली माहिती योग्य असून पुरेशी आहे. असा निर्णय देऊन सदरचे अपील हे खारीज केलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांना दिनांक २४.७.२००९ रोजी माहितीच्या खर्चाकरिता रुपये ६६/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक ३.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ती यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे व कोणत्याही आदेशाची प्रत दिली नाही. टिपणीची प्रत दिलेली आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचे कार्यालयीन शिक्के नाही तसेच योग्य त्या अधिकाऱ्यांची सही सुध्दा दिसून येत नाही. त्यामुळे योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यास जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जी टिपणी लिहून दिली त्या टिपणीची प्रत त्यांना दिलेली आहे. परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मुलाखती रद्य झाल्या त्या आदेशाची प्रत त्यांना देणे आवश्यक होते. यावरुन अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असा निष्कर्ष काढण्यात आला असून त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. अपीलकर्ती यांचेवर अन्याय झालेला दिसून येतो. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अन्यायाबाबत निर्णय घेता येत नाही असे असले तरी अपीलकर्ती यांना बंधपत्रित उमेदवाराचे निवेदन व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत बंधपत्रित उमेदवार यांचे निवेदनाची प्रत व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुलाखती स्थगित केल्याची प्रत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३८/२००९.**

श्री. धनंजय म. चित्रीव,
१२, प्रोसेस कॉलोनी, स्वालंबीनगर,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संदीप दिवाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर.

श्री. किशोर बेले,
जनमाहिती अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचेकडे लाचखोर कर्मचाऱ्याने केलेल्या लाच मागणी विरुध्द फिर्याद देण्यास आलेल्या व्यक्तिची तक्रार घेऊन पंचासह लाच रक्कम घेऊन थेट लाच सापळा न लावता लाचखोराकडे फिर्यादी व पंच विनालाच रक्कम जाऊन भेटून खरोखरच त्याने लाच मागितलेली आहे काय ? याबाबतची शहानिशा, पडताळणी पंचासमक्ष कोणते नियम कायदानुसार करण्यात येत आहे याबाबत सिवस्तर माहिती, स्पष्टीकरण, खुलासा कायदेशिररित्या देण्यात यावा अशी एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना

... २

दिनांक १२.८.२००९ रोजी १ ते ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. मात्र मुद्या क्रमांक ५, ६, ७ व ८ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आला व त्यामध्ये सदर प्रकरणाचा तपास सुरु असल्यामुळे व माहिती उघड केल्यामुळे तपासावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने याबाबतची माहिती नाकारण्यात येते. माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८(एच) चे तरतुदीनुसार जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तपास सुरु असल्यामुळे प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन दिल्यास तपासाचे संदर्भामध्ये कोणतीही व्यक्ती ही हस्तक्षेप करुन तपासावर त्याचा परिणाम करु शकतो. त्यामुळे अधिनियमाचे कलम ८(एच) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही व अद्याप पर्यंत आरोपपत्र दाखल झ ाले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना तसे कळविण्यात आले होते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मुद्या क्रमांक ५, ६, ७ व ८ च्या प्रमाणे जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १८.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६०/२००९.

श्री. राजू नामदेवराव खोडे,
एलआयजी ३०, ८६ कॉलनी,
शरदचंद्र नगर, हिंगणा रोड, नागपूर - ४४० ०१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर.

श्री. जे. टी. रघुवंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे आपण माझेकडून वर्ष १९९४ ते २००६ या कालावधीकरिता पाणी बिलाची एकूण रक्कम रुपये ३२४७५/- घेतलेली आहे व त्यावर विलंब शुल्क रुपये ८४८०/- आकारलेला आहे. उपरोक्त रक्कम कोणत्या वर्षी करिता कोणत्या मासिक दराने आपण घेतलेली आहे व त्यावर कोणत्या दराने विलंब

शुल्क वसूल करण्यात आले त्याची तपशीलवार माहिती देण्यात यावी. उपरोक्त वसूल करण्यात आलेली रक्कम अतिरिक्त वसूल करण्यात आलेली आहे काय ? किंवा माझेकडे अजून रक्कम बाकी आहे काय ? त्याची माहिती देण्यात यावी. अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात आली असल्यास ती आपण कधी परत करणार याची माहिती देण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.१०.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांना दिनांक २८.९.२००९ पर्यंत न चुकता अपीलकर्ता यांना माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.११.२००९ रोजी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ९.१२.२००९ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी रुपये ११०५०/- ही त्वरीत परत करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे व त्याबाबतचा निर्णय हा त्वरित करण्यात येईल. अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती दिनांक ११.१२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५७/२००९.**

श्री. दामोदर बळीरामजी चंगोले,
४७, पितृछाया भवन, बजरंग नगर,
मानेवाडा रोड, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता, अउदा,
बांधकाम सं. व सु. प्रविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या.,
इंगोले भवन, मानकापूर फरस, कोराडी रोड,
नागपूर.

श्री. आर. एस. गुरलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
अउदा, (संवसु) प्रविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या.,
विद्युत भवन, दुसरा माळा, काटोल रोड,
नागपूर - ४४० ०१३. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, अउदा प्रविभाग (संवसु) विद्युत भवन, नागपूर यांचेकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे

अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक ५.९.२००९ रोजी माहितीकरिता रुपये १०/- चा भरणा करावा असे पत्र दिले. त्याप्रमाणे त्यांनी शुल्क भरले व दिनांक १४.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी दिनांक १९.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. द्वितीय अपीलामध्ये श्री. डब्ल्यु. एन. मोटघरे, लॅब ॲटेंडट हे कोणत्या श्रेणीत मोडते वर्ग ३ की ४. श्रेणी ३ मध्ये मोडत असेल तर १९७५ पासून श्रेणी ३ चा लाभ देण्यात येणार किंवा नाही याबाबत लेखी खुलासा व इतर जोडपत्र अ व ब मध्ये दिलेले मुद्ये प्रत जोडलेली आहे. मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी द्वितीय अपीलात नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली त्या संदर्भामध्ये सदरची माहिती ही मुंबई येथील कार्यालयाचे संबंधित असल्यामुळे उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे असा खुलासा केलेला आहे. मात्र अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती ही दिनांक १५.९.२००९ च्या पत्राप्रमाणे तसेच मुंबई भ.नि.नि. कार्यालयास सुध्दा या कार्यालयाचे पत्र क्रमांक २६७, दिनांक २२.९.२००९ प्रमाणे श्री. मोटघरे यांचे विषयी सविस्तर खुलासा केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १९.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६१/२००९.**

श्री. अे. वाय. कल्लूरवार,
कर्नल चौक, शिवाजी वार्ड क्र. ८,
आसिफाबाद रोड, मु. पो. ता. राजूरा,
जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व)
ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
राजूरा, जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. प्रशांत घोरुडे, नायब तहसीलदार हे हजर आहेत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांचेकडे सन २००८-२००९ या वर्षात पिकाची नुकसान झाल्याने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने दिनांक ८ ऑक्टोंबर २००८ ला निर्णय घेतला. परंतु दिनांक ४.९.२००८ व दिनांक २९.१२.२००८ ला अर्ज केला होता. त्या अर्जावर विचार केला नसल्यामुळे माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २९.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये मुळ अर्ज हा तहसीलदार, राजूरा यांचे कार्यालय पत्र दिनांक २९.८.२००९ अन्वये तालुका कृषि

... २

अधिकारी, राजूरा यांचेकडे आवश्यक कार्यवाहीकरिता पाठविला आहे व त्या पत्राची प्रत आपणास दिलेली आहे. मुद्या क्रमांक २, ३, ४ व ६ ची माहिती पुरविण्याबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक १६.१०.२००९ अन्वये तहसीलदार, राजूरा यांना कळविण्यात आले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे लेखी युक्तिवाद सादर केलेला आहे. उपरोक्त विषयाला अनुसरुन कळविण्यांत येते की, मी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांना दिनांक १८.८.२००९ ला आपणांस सादर केलेल्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. त्यांनी केलेल्या पत्र व्यवहारांच्या पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. पत्र दिनांक २९.८.२००९ व दिनांक १६.११.२००९. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांचेकडून मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, राजूरा यांचेकडे दिनांक २९.९.२००९ ला अपील करण्यात आले होते. त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत सोबत जोडलेली आहे. पत्र दिनांक ३०.१०.२००९ व दिनांक १९.११.२००९. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांनी व तसेच उपविभागीय अधिकारी, राजूरा यांनी माहितीच्या आधारांतर्गत मागितलेली कोणतीच माहिती दिलेली नाही व तसेच तहसीलदार, राजूरा यांनी दिनांक १६.११.२००९ नुसार अर्जदाराची दिशाभूल केलेली आहे हे पुराव्यानुसार सादर करीत आहे. धान नुकसानीचे सर्व्हेक्षण त्यांच्या मार्फतीने झालेले आहे व त्यांनी रक्कम अदा केलेली आहे असे नमुद केलेले आहे. तर धान्याच्या नुकसानीच्या यादीवर तालुका कृषि अधिकारी यांनी स्वाक्षरी न करता तहसीलदार, राजूरा यांनी कशी काय केली आहे असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणजेच त्याचे सर्वेक्षण तालुका कृषि अधिकारी, राजूरा यांनी न करता तहसीलदार, राजूरा यांनी केलेले आहे असे दिसून येते. संबंधित शासन निर्णय या कार्यालयात प्राप्त नाही. पत्रात नमुद केलेले शासन निर्णय महसूल व वनविभागाशी संबंधित आहे. त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हते तर त्यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयातून प्राप्त करुन द्यावयास पाहिजे होते. तसे न करता जबाबदारी टाळून शासन परिपत्रक कार्यालयाला प्राप्त नाही असे कळविलेले आहे. आपला अर्ज दिनांक १८.८.२००९ चा अर्ज तालुका कृषि अधिकारी, राजूरा या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे पुढील कार्यवाहीस पाठविण्यांत आलेले आहे असे नमुद केलेले आहे. यावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

अंतर्गत सादर केलेले मुद्येच त्यांनी पाहिलेच नाही असे दिसून येते. पूर्ण अर्ज हा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. त्यांनी माहिती देण्याचे टाळलेले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी यांनी सुध्दा तहसीलदार, राजूरा यांच्या दिनांक १६.११.२००९ च्या पत्रावर विश्वास ठेवून त्यांनी सुध्दा माहिती तहसीलदार, राजूरा यांनी माहिती पुरविल्याचे कळविलेले आहे. एकंदरीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची टिंगल उडविलेली आहे व त्यांनी त्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या लेखी युक्तिवादावरुन असे दिसून येते की, संपूर्ण माहिती ही तहसीलदार, राजूरा यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होते. तालुका कृषि अधिकारी, राजूरा यांचेकडे सदरचा अर्ज पाठविण्याची आवश्यकता नव्हती व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, राजूरा यांना संपूर्ण माहिती ही तालुका कृषी अधिकारी, राजूरा यांचेकडून सुध्दा संकलीत करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व तसेच त्यांच्या दिनांक ४.९.२००८ व दिनांक २९.१२.२००८ ला दिलेल्या अर्जाचे संदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली याबद्यलची सुध्दा माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. वास्तविक तहसीलदार, राजूरा यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यांना ती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक ठरते. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही तहसीलदार, राजूरा यांनी उपलब्ध करुन देणे शक्य होते. तरी अर्ज हस्तांतर करण्यात आला. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णयात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते.

३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी चौकशी करुन व जबाबदारी निश्चित करुन करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे <u>जिल्हाधिकारी, चंद्रपूर</u> यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १९.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६६/२००९.**

श्री. विष्णु जगन पवार,
द्वारा - प्रदिपकुमार धनविज,
लुंबिनीनगर, नाचनगांव रोड,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. अजित देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण),
नागपूर.

श्री. बी. आर. पनपालिया,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय,
पुलगांव, ता. देवळी, ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगांव यांचेकडे एकूण झालेल्या सेवेचा कालावधी लक्षात घेता त्या अनुषंगाने ठेवावयाचे दस्ताऐवज आर्थिक लाभ व त्यावरील इतर नियमित पध्दतीचा अवलंब करणेबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्त यांना लेखी निवेदन दिले असून त्यात सदर अपील अर्जात नमुद केलेल्या मुद्या

... २

क्रमांक १ बाबत मला माझ्या सेवापुस्तकाची छायांकित प्रत मिळालेली असून त्याबाबत माझा काहीच उजर नाही. मुद्या क्रमांक २ व ३ बाबत व्यवस्थापनाच्या सभेमध्ये जो निर्णय घेण्यात येईल ते मला मान्य राहिल त्यात माझा काहीच उजर राहणार नाही. मुद्या क्रमांक ४ राष्ट्रीय सेवायोजनेच्या मानधनाबाबत महाविद्यालयाकडून मला रुपये ४८००/- अकांऊट पेयी धनादेशा मार्फत पूर्ण मानधन मिळाले आहे. त्याबाबतही माझा काहीच उजर नाही. हया व्यतिरिक्त व्यवस्थापनाबाबत व प्राचार्याबाबत माझी काहीच तक्रार नाही. करिता आपणास हयाद्वारे निवेदन आहे की माझ्या सदर द्वितीय अपील अर्जाची कार्यवाही येथेच बंद करण्यात यावी. त्याकरिता मी केलेली द्वितीय अपील कोणाच्याही दबावात न येता सदविवेक बुध्दीने परत घेत आहे अशी अपीलकर्ता यांनी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६५/२००९.**

श्री. फैजान अख्तर व. अब्दुल खालिक,
हंडी ओली, गुजरी बाजार, ता. कामठी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. पाटील, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००९ रोजी राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा के सहाय्यक शिक्षक श्री. रमाशंकर मिश्रा की नियुक्ती संबंधी माहिती एकूण ४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांचे पुढे मला माहिती मिळाली व माहितीमुळे माझे समाधान झाले असे कबूल केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २१.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६२/२००९, अपील क्रमांक १०६३/२००९ व अपील क्रमांक १०६४/२००९.**

श्री. हेमंत  दादुरामजी टेटे,
प्लॉट नं. ३५, स्वराजनगर,
मानेवाडा रिंगरोड, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सचिन तालेवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभाग क्र. २, गणेश भवन,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. यु. बी. चहांदे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महावितरण, विभाग क्र. २, गणेश भवन,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. तलवारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
शहर परिमंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
प्रकाश भवन, गड्डीगोदाम, नागपूर.

श्री. डी. बी. अंबादे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
प्रकाश भवन, गड्डीगोदाम, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००९ रोजी दोन अर्जाचे माध्यमातून व दिनांक ४.९.२००९ रोजी एका अर्जाचे माध्यमातून जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभाग क्रमांक २, महावितरण, नागपूर यांच्याकडे अनुक्रमे दिनांक २१.२.२००९ रोजी वैद्यकीय कारणाकरिता दिनांक २३.२.२००९ ते दिनांक २५.२.२००९ पर्यंत तीन दिवसाकरिता सुट्टीचा अगाऊ अर्ज दिला होता व श्री. रहाटे, स.अ. यांनी नामंजूर केला असे करता येते काय व कोणत्या नियमाने कोणत्या कारणाकरिता परिपत्रकाची झ ेरॉक्स जोडावी. वैद्यकीय कारणाकरिता कर्मचाऱ्याने मागितलेली रजा यापुर्वी नामंजूर करण्यात आली आहे काय. यासंबंधाने प्रशासनाचे काय दिशा निर्देश आहेत त्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दुसऱ्या अर्जामध्ये दिनांक १९.९.२००५ ते २५.२.२००९ या कालावधीत देण्यात आलेल्या विज कनेक्शनची संख्या तसेच पकडलेल्या विज चोरीची संख्या व माहिती दिलेल्या तक्त्यामध्ये मागितलेली दिसून येते व तिसऱ्या अर्जामध्ये दिनांक २२.२.२००९ रोज रविवारी १२:३३ वाजता दुपारी श्री. रहाटे, स. अ. हिंगणा यांच्या कार्यालयीन मोबाईल क्रमांक ९९६०६७८३३१ वरुन मी स्वतः हेमंत टेटे क.अ.(निलंबीत) यांच्या त्यावेळी असलेल्या कार्यालयीन मोबाईल क्रमांक ९९६०६७८३७४ वर करण्यात आलेल्या एस.एम.एस. (कार्यालयीन मॅसेज) चे कॉल डिटेल (मॅसेजच्या प्रतीसह) एअरटेल कंपनीकडून प्राप्त करण्यात यावे व त्याची एक प्रत मला देण्यात यावी. तसेच दिनांक १४.२.२००९ रोज शनिवारी १०:०६ वाजता सकाळी ९९६०६७८३३१ वरुन ९९६०६७८३७४ वर प्राप्त झालेल्या मॅसेजची एक प्रत मला देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.

३.	अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१०.२००९ रोजी मागितलेल्या तीन मुद्यांची माहिती कार्यकारी अभियंता, विभाग क्रमांक २, नागपूर यांच्या कडून घेण्यात यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. दिनांक १८.११.२००९ रोजी सेवाशर्तीच्या संदर्भातील वैद्यकीय रजेबाबतची छायांकित प्रती त्यांना दिलेली आहे. त्यानंतर वैद्यकीय रजे संबंधातील रजा नाकारण्याच्या संदर्भातील माहिती सुध्दा देण्यात आली होती. दुसऱ्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तक्त्यामध्ये उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते व तिसऱ्या अर्जामध्ये मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२००९ रोजी दोन प्रथम अपील व दिनांक ८.१०.२००९ रोजी एक प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. मात्र अपील क्रमांक १०६४/२००९ मध्ये प्रथम अपीलाची सुनावणी झाली असून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे एक अपील दाखल केलेले आहे.

४.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण आहे व दिशाभूल करणारी आहे. परंतु रजेच्या संदर्भात त्यांना संपूर्ण माहिती व रजा नाकारण्याची कारणे ही कळविलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे जशी माहिती उपलब्ध आहे तशी माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील क्रमांक १०६२/२००९ हे खारीज करण्यास पात्र आहे.

५.	अपील क्रमांक १०६३/२००९ मध्ये मागितलेल्या तक्त्यात माहिती उपलब्ध नसल्याने दिनांक १९.९.२००५ ते दिनांक २५.२.२००९ या कालावधीतील दिलेल्या वीज कनेक्शनची संख्या व वीज चोरी पकडल्याची संख्या ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शानास आणले की, त्यांच्या दुसऱ्या विभागाकडून तक्त्यामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे व आयटी डिपार्टमेंट हे त्यांचेच असल्यामुळे कार्यकारी अभियंता यांचेकडे सुध्दा ती माहिती उपलब्ध असली पाहिजे व त्यांना ती पुरविली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मुख्य अभियंता हे सुनावणीस हजर आहेत व त्यांनी सुध्दा सांगितले की, त्यांच्याकडे तक्त्यामध्ये माहिती उपलब्ध नाही. परंतु ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपातील छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करुन देता येतील.

... ४

६. अपील क्रमांक १०६४/२००९ मध्ये एस.एम.एस. च्या संदर्भात जी माहिती मागितलेली आहे ते कार्यालयीन मोबाईल असल्यामुळे त्यातील माहिती एअरटेल कंपनीकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन मागितलेली एस.एम.एस.ची माहिती एअरटेल कंपनी कडून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे असे त्यांनी सांगितले व एस.एम.एस. संदर्भात एअरटेल कंपनीने सुध्दा माहिती उपलब्ध नाही असे उत्तर आलेले आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी एअरटेल कंपनीला लिहिलेले पत्र व एअरटेल कंपनी करुन आलेल्या उत्तराची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपील क्रमांक १०६२/२००९ हे खारीज करण्यात येते.

२) अपील क्रमांक १०६३/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.९.२००९ च्या अर्जात मागितलेल्या कालावधीतील माहिती कार्यालयात ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपातील छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यांत यावी.

३) अपील क्रमांक १०६४/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.९.२००९ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात एअरटेल कंपनीला लिहिलेले पत्र व एअरटेल कंपनी कडून आलेले पत्र यांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६७/२००९.**

श्री. एम. एच. सयाम,
बिंदु ५३१, लेंड्रा, जुना रामदास पेठ,
नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. ए. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. आर्वी, जि. वर्धा.

श्री. बागुल,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कारंजा घाडगे,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.८.२००९ रोजी सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कारंजा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Agricultural land at survey No. १५५ R-१, R-८० at mouza Kannamwargram, Tal. Karanja, as on today stands in the name of Vinod Lomeswar Sendare of Jamnai (Hetikundi) Tah. Karanja, as per Patwari record vide M.No. १०५ dated ३०.१.२००० prior to that Smi. Ashwini Yeshwant Gundewar of Kannamwargram was owner. That for effecting mutation

... २

sale purchase transaction between the parties is a mandatary document without which it can not be done. In the instant case though there is no sale purchase between Smt. Ashwini Y. Gundewar and Vinod Lomeswar Sendare of Jamni, the land in question, was transferred on the latter's name. Saledeed being such a vital document absolutely required for the mutation. It is not understood how the mutation process was carried out in the absence of such a important document, which may not have the legal sanctity within the perview of Land Revenu Code. This is nothing short of gross negligence and illegal act of commission and omission, as such it needs detailed examination of records to find out the truth. सदरच्या माहितीचा कालावधी १९९७ ते २००० आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कारंजा यांनी आयोगाकडे खुलासा करतांना अपीलकर्ता यांचा अर्ज कार्यालयात आढळून आला नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही किंवा नोंद झालेली नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देता आला नाही असे आयोगापुढे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे रजिस्टर पोष्टाने पाठविलेले आहे. त्याबद्यलचा पुरावा आयोगाकडे सादर केलेला आहे. मात्र त्या पावतीवर कार्यालयाचा कोणताही प्रकारचा शिक्का नाही असे उपविभागीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. असे असले तरी आयोगाचे कार्यालयातून आलेल्या नोटीस सोबत आलेल्या अर्जाचे संबंधाने संपूर्ण माहिती तयार करुन आणली आहे व ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी दोनही कार्यालयामध्ये अर्ज व अपीलाची नोंद झाली नाही याबद्यलची चौकशी करणे आवश्यक आहे व स्विकृती देऊन नोंद केली नसल्याने संबंधित लिपिकाचे विरुध्द चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत उपलब्ध असलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

२) तहसील कार्यालय, कारंजा मध्ये तसेच उपविभागीय अधिकारी, आर्वी कार्यालयामध्ये नोंदणीकृत टपालाद्वारे आलेल्या टपालाची जर नोंद केली जात नसेल तर त्याबद्यलची कार्यवाही संबधित लिपिकावर करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २१.१२.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६४/२००९.

श्री. महेंद्र नानाजी मून,
आदर्शनगर, त्रिंलोक्य बौध्द विहाराजवळ,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अ. मा. भट्टलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

श्रीमती अल्का पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शालेय शिक्षण सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शालेय शिक्षण सचिव, मुंबई यांना राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी दिलेल्या दिनांक ५.६.२००९ च्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी दिनांक १२.१२.२००७ ला त्यांचे पत्र क्र. माध्य/क/२२०६३/२००७ शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर समायोजन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळण्याबाबत. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले

... २

आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २६.११.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट नाही त्यामुळे त्यांना दिलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरचे प्रकरणाची जी टिपणी सादर झाली आहे त्या टिपणीच्या आधारावर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या टिपणीचे अवलोकन केले असता त्यात शालेय न्यायाधिकरणाकडे प्रकरण प्रलंबित आहे अशी टिपणी केली व त्याबद्यलच्या सर्व प्रतीं त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच राज्य मानवी हक्क आयोगाचे संदर्भात सुध्दा त्यांनी संचालकांना आदेश दिलेले आहेत हेही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झ ालेली आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा ही सदरच्या प्रकरण हे प्रलंबित असून लवकर निर्णय होत नाही असे दिसून येते. परंतु त्याबाबत आयोग कोणतेही आदेश देऊ शकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८५/२००९.**

श्री. शरद दिनकरराव पाचखेडे,
द्वारा - कृष्णराव अवताडे,
पोलीस मुख्यालया समोर,
पटेल नगर, चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती सु. वि. कोळेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (कार्या-१५)
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

श्री. शशांक धुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (पापु-१५)
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडे श्री. जे. डी. दराडे, मुख्य अभियता यांचे चौकशी अहवालानुसार योग्य अशी कार्यवाही करावी अशा प्रकारचे आदेश मा.मुख्यमंत्री व मुख्य सचिवांनी देऊनही दिनांक १८.८.२००९ रोजी दिलेल्या निवेदनावर अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांनी काय कार्यवाही केली याचा

... २

तपशील देण्यात यावा. तसेच श्री. ना. रा. शेरे, उपसचिव व श्री. श्री. घोलप, कक्ष अधिकारी यांचे पत्ते देणे शक्य नसल्यास ते माहिती अधिकाराच्या कोणत्या नियमांनी देता येत नाही त्या नियमाची झेरॉक्स प्रत द्यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.३.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम कलम २(च) मध्ये व्याख्या केल्यानुसार उपलब्ध असलेली माहितीच पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन व पृथःकरण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती देणे अभिप्रेत नसल्यामुळे आपणांस माहिती देता येत नाही. आपण वारंवार एकाच प्रकारची माहितीची विचारणा करीत असल्याने व त्या माहितीमध्ये कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नसल्याने सदर माहिती आपणांस उपलब्ध न करुन देण्याबाबतचा निर्णय यापूर्वी घेण्यात आला आहे. मुद्दा क्रमांक २ बाबत आपणांस कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे घेण्यात आलेले नाही असे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.१२.२००९ रोजी देण्यात आला असून आपण दिनांक २७.४.२००९ रोजी केलेले अपील तसेच दिनांक २१.५.२००९, दिनांक २१.७.२००९, दिनांक ११.८.२००९ व दिनांक २५.९.२००९ च्या निवेदनांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, श्री. ना. रा. शेरे, तत्कालीन उपसचिव व श्री. श्री. घोलप, कक्ष अधिकारी यांनी त्यांची वैयक्तिक माहिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार २००५ या अधिनियमातील नियम ८ मधील १(छ) नुसार सदर माहिती आपणास उपलब्ध करुन देता येत नाही. असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना दिनांक १८.८.२००८ रोजी दिलेल्या निवेदनावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. शासकीय कार्यालयात कार्यवाही याचा अर्थ संबंधित तक्रारीचे संदर्भात चौकशी ही करुन त्याबाबत टिपणी किंवा निर्णय हे करण्यात येते व त्या टिपणी किंवा निर्णयाची प्रत देणे म्हणजे कार्यवाही करण्याची माहिती देणे असा साधा सोपा अर्थ आहे. परंतु तशा प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करुन न देता मागितलेली माहिती अधिनियमाचे कलम २(च) प्रमाणे नाही माहितीचे

संकलन, संशोधन व पृथ:करण करणे आवश्यक आहे अशा स्वरुपातील माहिती देणे अभिप्रेत नसल्यामुळे आपणांस माहिती देता येत नाही. हे उत्तर अतिशय चुकीचा अर्थ लावून दिलेले आहे व यावरुनच माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असाही अर्थ निघु शकतो व त्यामुळे अवर सचिव तथा जनमाहिती अधिकारी यांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांची आहे. त्यामुळे अपीलकर्ता हे गैरहजर राहिले तरी अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात विचारणा करणे आवश्यक आहे व माहिती उपलब्ध झाली नसल्यास ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु तसाही प्रयत्न अपीलीय अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता अर्जात हे वेगवेगळया पध्दतीने माहिती मागत आहेत असा दिसून येते. कारण त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही असे दिसून येते व सोईनुसार अधिनियमाच्या तरतुदीचा अर्थ लावला जातो असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १८.८.२००८ च्या निवेदनातून झालेल्या चौकशीची कागदपत्रे टिपणी व निर्णय यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.३.२००९ च्या मुद्या क्रमांक १ मध्ये नमुद केलेल्या दिनांक १८.८.२००८ च्या निवेदनावरील चौकशीची कागदपत्रे, टिपणी व निर्णयाची छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावीत.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८०/२००९.**

श्री. ईश्वरदास चिंतामण टेंभूर्णे,
प्लॉट नं. ५७१, माडल टाऊन, इंदोरा,
पोस्ट जरिपटका, नागपूर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विक्रीकर सह आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. दि. श. वाघमारे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक विक्रीकर आयुक्त,
विक्रीकर सहआयुक्त, (व्हॅट) प्रशासन,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९, दिनांक ३०.७.२००९ व दिनांक २३.९.२००९ रोजी ३ अर्जाचे माध्यमातून जनमाहिती अधिकारी तथा विक्रीकर सह आयुक्त, नागपूर यांचेकडे ऑल इंडिया रिपोर्टर इंजिनिअरींग कंपनी, जी १४, एम.आय.डी.सी. हिंगणा रोड, नागपूर वर्ष २००४ पर्यंत विक्री कराची किती रक्कम थकीत असल्याबाबत माहिती आणि या नंतर कोणत्या वर्षी विक्रीकर भरण्यात आले. वर्ष २००२ पासून २००९ पर्यंत विक्रीकराची रक्कम भरलेली अथवा नाही याची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची

... २

माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.८.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २६.८.२००९ रोजी व दिनांक २८.१०.२००९ रोजी २ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती १९९७ पर्यंत कर भरल्याबद्यलची आहे व त्यानंतर कर भरला किंवा नाही ही माहिती दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आमच्याकडे संपूर्ण अभिलेख तपासून माहिती दिलेली आहे. त्यामुळे कंपनीने कर भरला नसल्यास तशी माहिती आमच्याकडे येत नाही. त्यामुळे त्यांना तपासून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कंपनी बंद झाली व त्यांनी १ करोड कर भरला आहे म्हणून त्यांनी माहिती मागितली. परंतु त्याबद्यलचा कोणताही पुरावा त्यांचेकडे नाही यावरुन कार्यालयाने दिलेली माहिती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २२.१२.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८१/२००९.

श्री. राजू शंकरराव निकोसे,
मु. पो. सावरी (बिड), ता वरोरा,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, वरोरा,
जि. चंद्रपूर.

श्री. आर. एम. फुलझेले,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
पंचायत समिती, वरोरा,
जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, वरोरा यांचेकडे एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी २००६ ते २००९ असून सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. त्याच माहितीकरिता अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक १७५७/२००७, अपील क्रमांक १०६/२००८, अपील क्रमांक २२४/२००८, अपील क्रमांक ४२७/२००९ व अपील क्रमांक ६५६/२००९ हे दाखल केले होते व त्या सर्व अपीलामध्ये त्यांना माहिती वेळोवेळीउपलब्ध करुन दिली असल्यामुळे

... २

खारीज करण्यात आलेले आहेत व त्यामुळे सदरची अपील हे सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८२/२००९.**

श्री. राजू शंकरराव निकोसे,
मु. पो. सावरी (बिड), ता वरोरा,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, वरोरा,
जि. चंद्रपूर.

श्री. व्ही. आर. खांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस निरिक्षक,
पोलीस स्टेशन, वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००७ व दिनांक २७.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन, वरोरा यांचेकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार नियम, २००५ चे कलम ८(ह) नुसार माहिती नाकारण्यात आली आहे व तसे त्यांना पोस्टाने कळविण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक ३१.१०.२००९ रोजी

... २

उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांनी माहितीच्या संदर्भामध्ये सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. व्ही. आर. खांडेकर यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिले व त्या प्रताची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये गैरअर्जदाराची रिपोर्ट वाचू न देता जबरदस्ती करीत मारुन व शिव्या देऊन सही का करावी लावली त्याची सत्यप्रत. दिनांक १८.६.२००८ ला रिपोर्ट दिला असता चौकशी करुन कार्यवाही न करता माझ यावर जबरदस्ती करुन पुन्हा गुन्हा नोंदवून मेडिकल रिपोर्ट घेऊन पागल आहे म्हणून का ठरवले त्याची सत्यप्रत दयावी. कोठडीमध्ये २ दिवस ठेवून जेवण न देता उपाशी ठेवून गावला जातो म्हटले असता जावू दिले नाही त्याची सत्यप्रत. जमानत घेण्यासाठी ५% व्याजाने २०००/- रुपये खर्च करुन सुटका केल्यावर माझी पिशवी, पट्टा, माहिती अधिकाराचे पुस्तक व घडी गेडाम पोलीसांनी न देता कुठे गहाळ केली त्याची सत्यप्रत. पोलीस कामडी, गेडाम व त्याचा सहकारी पोलीस अधिकारी मला जबरदस्ती करीत पागल नसतांनी मेडीकल करण्यासाठी का नेले त्याची सत्यप्रत. सदर माहिती ही लेखी स्वरुपात दयावी. दिनांक २.७.२००८ ला कार्यवाही न करता अगोदर तक्रार अर्ज देवून सुध्दा गैरअर्जदाराचा विचार करुन उलट माझ्यावर गुन्हा का नोंदवला हयाचे कारण व माझ्या रिपोर्टनुसार गैरअर्जदारावर कार्यवाही का केली नाही याचे कारण पोलीस कर्मचारी कामडी, नगराळे, आत्राम, गेडाम, विश्वास व सहकारी मला मनःस्ताप देऊन अन्याय करुन आर्थीक त्रास देतात यांचे कारण व गुन्हा केला नसतांना गुन्हयाची नोंद का करुन घेतात यांचे कारण लेखी माहिती देवून ताबडतोब कळवावे. अशी कारणे दिलेली दिसून येते.

३. युक्तिवाद करतांना अपीलकर्ता यांनी गैरअर्जदाराच्या तक्रारीची प्रत उपलब्ध करुन दिली नाही व इतर जी माहिती दिलेली आहे ती अपूर्ण दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये ज्या माहितीचे वर्णन केलेले आहे त्यावर बहुतांश माहिती ही तोंडी स्वरुपाची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती ही कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती पुरविता येते. तोंडी कोणत्याही

प्रकारची बोलणी झालेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे गैरअर्जदाराने केलेल्या तक्रारीची प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच जनमाहिती अधिकारी यांचे कोणत्याही प्रकरणात मत मागता येत नाही. त्यामुळे गुन्हा दाखल कां केला नाही असे मत मागता येत नाही. मात्र त्याबद्यलची टिपणी असेल ती उपलब्ध करुन देता येईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत गैरतक्रारदार यांनी अर्जदाराची दिलेल्या तक्रारीची सत्यप्रत तसेच अपीलकर्ता यांनी दिलेल्या अर्जाचे संदर्भात जर टिपणी तयार केली असेल व निर्णय दिला असेल त्या निर्णयाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८३/२००९.**

श्री. हगरु राघोजी कापगते,
मु. पो. सेंदूरवाफा, ता. साकोली,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. अहिरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, साकोली,
जि. भंडारा.

श्री. आर. टी. लांबट,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, सेंदूरवाफा,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली यांचेकडे मौजा सेंदूरवाफा ता. साकोली, जि. भंडारा येथील साकोली ते सेंदूरवाफा सरहद्दीवरील उत्तर दिशेकडील जंगल कामगार सोसायटी जवळील ग्रामपंचायत सेंदूरवाफा येथील जागा सामाजिक वनीकरणाकरिता सन १९७८ ते १९८४ च्या कालावधीत वन विभागास हस्तांतरण केलेल्या जागेची ग्रामपंचायत कडून ठरावाची नक्कल प्रत. तसेच अतिक्रमणचे घर ग्रामपंचायतच्या विनामंजूरीने १९८४ ते

... २

२००७ पर्यंत किती घरे ग्रामपंचायत दर्ज केले. अतिक्रमणचे घरे कोणत्या सरपंच व सचिवांच्या काळात ग्रामपंचायत रेकॉर्डला दर्ज झाले ? याची रितसर माहिती हवी. तसेच अतिक्रमण धारकावर ग्रामपंचायत कारवाई कां करीत नाही ? व किती लोकांवर आजपर्यंत अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली व डोंगरपहाड पोखरुन उत्तर दिशेकडे किती लोकांना घरे बांधण्यास ग्रामपंचायतनी नाहरकत प्रमाणपत्र दिले याची सुध्दा माहिती हवी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.८.२००७ रोजी रुपये ३२०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व दिनांक १७.८.२००७ रोजी तपशीलात खर्चाचा भरणा व टपाल खर्च कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी अतिरिक्त रकमेचा भरणा न करता दिनांक २२.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १३.९.२००७ रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये माहिती निशुल्क पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती ही दिनांक २४.९.२००७ रोजी संपूर्ण कागदपत्रासहित उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अर्जदारास माहिती पुरविल्याची पोचपावती सोबत जोडलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ८.१०.२००९ रोजी एकूण २३ महिन्याचे नंतर द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता कार्यालयात हजर झाले त्यांनी हजर झाल्याची सही केलेली आहे. परंतु सुनावणीचे वेळेस ते गैरहजर होते व सुनावणी संपल्यानंतर ते हजर झाले व त्यांनी अपूर्ण माहिती मिळाली असे सांगितले. तसेच त्यांनी निवेदन सुध्दा दिलेले आहे. परंतु त्यात अपूर्ण माहिती काय दिली याबद्यलचा खुलासा त्यांनी केलेला नाही. मात्र माहितीचे अवलोकन केले असता त्यांना माहिती संपूर्ण उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती मिळाली. मात्र लेटरपॅडच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्पर पत्र व्यवहार केला त्याबाबत प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेही माहिती अधिकारी यांनी दिलगिरी व्यक्त केली होती व माहिती न देण्याचा हेतु नव्हता असा खुलासा केलेला आहे. त्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्याची त्यांची विनंती मान्य करता येत नाही. परंतु उर्वरित माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी अपूर्णतेच्या संदर्भात किंवा दिशाभूलच्या बाबत तपशीलात खुलासा केलेला नाही. अपील सुध्दा २ वर्षाने केलेले असल्यामुळे मुदत बाहय आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८४/२००९.**

सौ. ललिताबाई चरणदास शहारे,
मु. तुमसर, पो. तेढा, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. आर. बी. आकुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
गोरेगांव, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे माझ ी अतिक्रमणची केस एस.डी.ओ. कडून परत आली त्या केसची नक्कल मिळणे बाबत माहिती पाहिजे. माहितीचा कालावधी २००२ ते आजपर्यंत मला रा.मा.क्र. १०/एल.ई.एन.३९, मौजा तुमसरची आबादी जमीन मिळण्याची केसची नक्कल संपूर्ण कागदपत्रासह नक्कल पाहिजे. ५००/- रुपये दंडाचे भरलेल्या कागदासह माहिती त्वरित पाहिजे. सदरची माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१०.२००९ रोजी आपणास देण्यासाठी या कार्यालयात तयार आहे.

...२

करिता कार्यालयीन दिवशी कार्यालयाचे वेळेत येऊन माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. दिनांक १८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. दिनांक ६.११.२००९ रोजी प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर राहावे असे निर्देश दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.११.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी दाखल केलेला आहे. तसेच अपीलकर्ती यांना संपूर्ण प्रकरणाची माहितीची कागदपत्रे आहेत. परंतु त्यांना पट्टा मंजूर करुन हवा आहे. अपीलकर्ती यांना ज्या माहितीची अपेक्षा आहे ती मौजा तुमसर, तालुका गोरेगांव येथील शासकीय जमीन गट नं. ६५७, आराजी ०.२४ हे.आर. पैकी ०.०२ हे.आर. जागेवर घराचे बांधकाम करुन केलेले अतिक्रमण नियमानुकुल करण्याबाबतचे श्रीमती लतिकाबाई चरणदास शहारे, रा. तुमसर, ता.गोरेगांव, जि. गोंदिया यांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत आपले राजस्व प्रकरण क्रमांक ७/एल.ई.एन. ३९/ २००२-२००३, मौजा तुमसर, ता. गोरेगांव येथील प्रकरणांत त्रुटया असल्यामुळे त्रुटयांची पुर्तता करिता मुळ प्रकरण पाठविण्यात येत आहे. तसेच संदर्भीय पत्रात नमुद मुद्यांवर तात्काळ माहितीसह मुळ प्रकरण या कार्यालयास सादर करावे असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे पूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी बाबू लोकांचे अडेलतट्टूपणा मुळेच पुढे फाईल सरकली नाही. पैसे मागित आहेत. ६ वर्षापासून केस प्रलंबित आहेअशा प्रकारची कारणे द्वितीय अपील मेमोमध्ये केलेले आहे. तहसीलदार, गोरेगांव कडे २००३ रामाक्र. १०/एलईएल-३९/मौजा तुमसरची आबादी जमीनी वरील अतिक्रमणची केस नक्कल मिळणेबाबत. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले त्या संपूर्ण केसची छायांकितप्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांना पट्टा मंजूर करण्याची अपेक्षा दिसून येते. परंतु संपूर्ण प्रकरणात पट्टा मंजूर करता येत नाही म्हणून अपीलीय अधिकारी यांचेकडे परत आलेले आहे. माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देता येत नाही म्हणून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७९/२००९.

श्री. यशवंत बळीराम दुर्योधन,
द्वारा - दिपक कन्सल्टन्स,
आझाद बगीच्यासमोर, एम. जी. रोड,
चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर.

श्री. बी. एस. मेश्राम,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर होते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्याकडे मौजा चिचोली (बु.) येथील ३३० पैकी ३.८३ हे.आर. आदेशाची व प्रकरणातील कागदपत्राची नक्कल मिळण्याबाबत. १९८० ते २००९ या कालावधीची अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच एकूण ६ मुद्यांवर माहिती सत्यप्रती सुध्दा मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.७.२००९ रोजी सदर प्रकरण या कार्यालयात उपलब्ध आहे. तरी आपण १ ते ६ मुद्यांवरील माहितीची मागणी केली आहे त्याचा खर्च रुपये २६६/- खजिना दाखल करुन सदर माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु

... २

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २२.९.२००९ रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा रुपये २६६/- चा भरणा करावा असे पत्र त्यांना दिलेले आहे. त्या पत्राचे संदर्भात पोस्टाची पावती हया कार्यालयास दाखल केलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे त्यांना कळविलेल्या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८९/२००९.**

श्री. ललीत श्रीराम घरडे,
मु. खोकरला, पो. मोहदुरा,
ता. जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, भंडारा.

श्री. डी. एस. साठवणे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोकरला,
पो. मोहदुरा, ता. जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावतीने श्री. व्ही. एस. चरपे, वरिष्ठ विस्तार अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा यांचेकडे सौ. आशा ललीत घरडे, स्त्री कामगार, यांचे दिनांक १.१.२००७ ते ३१.३.२००७ चे स्त्री कामगारांचे वेतन अदा पत्राची सत्यप्रत देण्यात यावी. शिल्लक वेतन कोण देणार ?, केंव्हा देणार ?, कसे देणार ?, स्त्री कामगार जिल्हा परिषद शाळेत पुर्ण वेळ काम करण्याऱ्या स्त्री कामगारांचे शासन निर्णयाने २००७ चे वेतन किती ? सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या

... २

माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भंडारा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २०.८.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये माहिती अधिकारी यांनी छायांकित प्रती पुरविल्याचे तसेच अर्जदाराने अर्जात प्रमाणित प्रतीचा उल्लेख केला नसल्याने प्रमाणित प्रती दिले नसल्याचे माहिती अधिकाऱ्यांचे मत मान्य करण्यात येत आहे. अर्जदाराने पुरविलेल्या पावती प्रतीवरील स्वाक्षरी तसेच अर्जदाराने पुरविलेल्या पावती वरील व कार्यालयातील इतर दस्ताऐवज वरील स्वाक्षरी एकच असल्याने माहिती अधिकाऱ्याने बनावट सही करुन खोटी माहिती दिल्याचे म्हणणे मान्य करता येत नाही. तसेच दिनांक २८.१.२००९ चे समेटात थकीत वेतन देण्याचा उल्लेख नसल्याने वेतन कोण, केंव्हा व कसे देणार याबाबत माहिती पुरविणे माहिती अधिकाऱ्याला बंधनकारक नाही. असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जी माहिती उपलब्ध करुन दिली ती बनावट आहे व खोटी आहे. परंतु प्रथम अपीलामध्ये जी माहिती दिली ती बरोबर आहे. परंतु वेतन हे पूर्ण दिले जात नाही तरी जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, वेतन दिले जात नाही ते मानधन दिले जाते व मानधन हे विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे कमी जास्त होते. त्यामुळे जी माहिती दिली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २३.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०९०/२००९.**

श्री. महेंद्र नानाजी मून,
मु. आदर्शनगर, त्रिलोक्य बौध्द विहारजवळ,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

श्री. सदानंद शंकरराव शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडे शासनाच्या दिनांक ४.४.२००८ व दिनांक २७.८.२००८ च्या पत्रान्वये मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचेकडे संदर्भीय पत्रानुसार झालेल्या सुनावणी प्रसंगी शासनाने दिलेल्या निदेशानुषंगाने शिक्षण संचालक, पुणे यांना प्रकरण अंतिमतः निकाली काढण्यासंबंधी

दिलेल्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा निर्णय व अहवाल तात्काळ मिळण्याबाबत. तसेच राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई केस नं. ८०/३१/२००६-०७/१९४२, दिनांक ५ जून २००९ च्या निर्देशानुसार शासनाने दिलेल्या आदेशानुसार आपण केलेल्या कार्यवाहीचा निर्णय व अहवाल तात्काळ मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००९ रोजी संचालनालयाचे पत्र क्र. अमाशा/३४०७/६१७००/१४-क(०५)/५६०९, दिनांक १८ जून २००९ व विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचे पत्र क्र. माध्य/क/१२९८०/२००८, दिनांक २० जून २००९ यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना निर्णय व अहवालाची प्रत मिळालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेला निर्णय झाला नसल्यामुळे अहवाल सुध्दा मिळालेला नाही व अपीलकर्ता यांनी अहवालाच्या प्रत मागणी संदर्भात निर्णय व अहवाल तात्काळ द्यावा. त्यावर कार्यवाही करुन द्यावी अशी माहिती मागितलेली आहे. त्यावर निर्णय न झाल्यामुळे त्याबाबतचा अहवाल उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र त्याबाबत दिनांक २०.६.२००८, दिनांक ८.१०.२००८, दिनांक १८.१०.२००८, दिनांक ११.१२.२००८ व डिसेंबर २००८ असा जो पत्र व्यवहार झालेला आहे तो पत्र व्यवहाराच्या प्रती दिलेल्या आहेत व त्यामुळे अपीलकर्ता यांना जशी माहिती आहे तशी उपलब्ध झालेली आहे असे असले तरी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीची माहिती निर्णय व अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून १ महिन्याचे आंत झाल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावा. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.८.२००९ च्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ च्या संदर्भात कार्यवाहीचा अहवाल व निर्णय १ महिन्याचे आंत झाल्यावर त्यांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २३.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०१५/२००९.**

श्री. नामदेव मुकुंदराव चिमुरकर,
रा. आदिवासी मोहल्ला, वार्ड क्र. ३,
ता. भिवापूर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. यु. जे. वसू,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, भिवापूर,
ता. भिवापूर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. सलामपूरे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत भिवापूर यांचेकडे भूमीगत नाली बांधकामाबाबत सन १९९९ ते २००४ तसेच आजतागायत केलेली कार्यवाही शासन निर्देशाचे आदेशान्वये अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती जुनी असल्यामुळे विलंब होईल त्याकरिता दिनांक २३.१.२००७ रोजी पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १३.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील हे २ वर्षानंतर दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे. नालीचे बांधकाम झालेलेच नाही व झाले आहे असे दाखविले. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्याबाबतचे एस्टीमेट तयार झाले आहे. ग्रामपंचायत ठराव झालेला आहे. परंतु ती भूमिगत नाली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे घरासमोरील नालीचे बांधकाम झाले नाही त्यामुळे त्या नालीचे घाण पाणी वाहत असते. याबाबत त्यांनी नंतर तक्रार केलेली असून अपीलकर्ता यांच्या तक्रारीची चौकशी होत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, नालीमध्ये कचरा टाकून ती बुजवितात त्यामुळे घाण पाणी वरुन वाहत असते. परंतु सदरच्या प्रकरणी माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८६/२००९, अपील क्रमांक १०८७/२००९ व अपील क्रमांक १०८८/२००९.**

श्री. महेंद्र सदाशिव पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड क्र. १०,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा.

श्री. दिपक महेंद्र पांडेय,
चुडी मोहल्ला, वार्ड क्र. १०,
पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुधीर शंभरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा.

श्रीमती ए. के. पन्नीकर,
जनमाहिती अधिकारी तथा
आस्थापना प्रमुख,
नगरपरिषद कार्यालय, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा.

श्री. दिपक लांडगे,
कर अधिक्षक,
नगरपरिषद कार्यालय, पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेवतीने त्यांचा मुलगा हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपील क्रमांक १०८६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ मध्ये राज्य जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगरपरिषद, पुलगांव यांचेकडे जिल्हाधिकारी, वर्धा यांचे पत्र क्र. अका/नपाप्र/
सक्र २९(०८) कावि-४४१/०९, दिनांक २४.५.२००९ चा अनुपालन अहवालाची प्रत पुरविण्याबाबत. माहितीचा कालावधी २००२ ते २००९ असा दिलेला आहे. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी मुख्य अधिकारी, नगरपरिषद, पुलगांव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ८.१२.२००९ रोजी निर्णय देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपीलकर्ता यांनी दिरंगाई करणाऱ्या कर्मचारी विरुध्द कार्यवाही न करण्याचे कारण विचारले आहे. ते जनमाहिती अधिकारी यांचे अधिकारात येत नसल्यामुळे व सदरची माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे या कार्यालयीचे स्तरावर अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १०८७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव यांचेकडे मालमत्ता हस्तातंतरीत करण्यासाठी लागणारे कागदोपत्र पुराव्याचे प्रमाणित प्रती सन १९९१ पासून सन २००९ पर्यंत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.१२.२००९ रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निकालामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५.  प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु अपीलकर्ता यांनी नगरपरिषदेच्या इतिवृत्ताची मागणी केली असल्यामुळे त्यांना संबंधित माहितीच्या संदर्भामध्ये जे ठराव झाले आहे त्या ठरावाच्या संदर्भात निरिक्षण करण्याची परवानगी देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६.  अपील क्रमांक १०८८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, पुलगांव यांचेकडे दिनांक १४.३.२००५ च्या आक्षेप अर्जाच्या अनुषंगाने माझी बाजू मांडण्याकरिता देण्यात येणारी संधीचे नोटीसाची व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही तपशील पारित केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत पुरविणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

७.  प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे. परंतु ज्या आवक जावक लिपिक यांनी अपीलकर्ता यांनी दाखल केलेले आक्षेप हे योग्य त्या अधिकाऱ्यांकडे चौकशीकरिता पाठविले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. परंतु माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपील क्रमांक १०८६/२००९ हे खारीज करण्यात येते

२) अपील क्रमांक १०८७/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना संबंधित नगर परिषद ठरावाचे निरिक्षण करण्याकरिता त्यांनी स्वतः जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे. अशा प्रकारे लेखी कळविल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधित ठरावाचे निरिक्षणाकरिता रजिष्टर उपलब्ध करुन देण्यात यावे व तशी पोच घ्यावी.

३) अपील क्रमांक १०८८/२००९ हे खारीज करण्यात येते.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०९१/२००९.**

श्री. हेमंत रमेशराव अडसुळे,
श्री. संत मारोतीभाऊ समाधीच्या बाजूला,
सुयोग लॉन्सच्या मागे, जुनी म्हाडा कॉलनी लगतचा परिसर,
सिंदी (मेघे), जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. डी. बन्सोडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
वर्धा.

श्री. सी. डी. पिंपळे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी, बोरगांव मेघे,
तहसील कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वर्धा यांचेकडे दिनांक १५.४.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी, वर्धा हयांनी श्री. सी. डी. पिंपळे, तलाठी, बोरगांव(मेघे) वर्धा हयांना ०.१४ आर. अकृषक जागेचा ७/१२ बाळकृष्ण नथ्थुजी झाडे, वर्धा हयांना देण्याचे आदेशपत्र दिले आहे व त्या आदेशाचे पालन करुन तोंडी पिंपळे, तलाठी हयांनी बाळकृष्ण नथ्थुजी झाडे हयांना भुमापन क्रमांक २०९/२ अकृषक जागेचा ७/१२ दिनांक ४.८.२००८ रोजी तयार करुन दिला आहे. हा ७/१२ (अधिकार

... २

अभिलेख पत्र) नियमानुसार फेरफार घेऊन तयार केला असेल तर फेरफार क्रमांक व फेरफार पंजीची नक्कल द्यावी. या प्रकरणातील संपूर्ण रेकॉर्ड मला पाहण्याकरिता उपलब्ध करुन द्यावा. दिनांक व वेळ कळवावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तहसीलदार, वर्धा यांनी दिनांक ३.९.२००९ रोजी श्री. सी. डी. पिंपळे, तलाठी, बोरगांव (मेघे) यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात आदेश दिलेले दिसून येते व त्या प्रमाणे दिनांक २६.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.१०.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली व उपलब्ध झालेली माहिती ही योग्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच अहवाल गहाळ झाला असे सांगितले असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात तलाठी यांनी प्रथम अपीलात खुलासा केलेला आहे. सदरच्या खुलाश्याप्रमाणे विधानसभा निवडणूका असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला व तो खुलासा समाधानकारक असल्यामुळे असा निष्कर्ष काढलेला आहे. अहवालाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अहवालाची प्रत ही एकच होती व ती उपविभागीय अधिकारी यांस दाखल केली होती व दुसरी प्रत उपलब्ध नाही. त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र आदेशाची प्रत उपलब्ध असल्यास त्यांना प्राप्त करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी निरिक्षणाची विनंती केली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या संबंधित नस्तीचे निरिक्षण करावयाची परवानगी देणे योग्य राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाची वेळेस तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे व उपस्थित झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी अपीलकर्ता यांना संबंधित नस्तीचे निरिक्षण करुन देण्यास उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११००/२००९ व अपील क्रमांक ११०१/२००९.

श्री. विजय दिवाकर खरवडे,
मु. पो. आलापल्ली, साई मंदीर जवळ,
गोंड मोहल्ला, ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एन. बनकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वन परिक्षेत्र अधिकारी,
आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
वन परिक्षेत्र अधिकारी,
आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलामध्ये दिनांक २१.७.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र, आल्लापली वनविभाग यांचेकडे अनुक्रमे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. चिंचाळकर यांचे कारकीर्दीत कोणत्या वर्षी शासकीय सॉ मिल येथे कंपाऊंड करण्यात आले. तसेच वनविभाग आलापल्ली वनपरिक्षेत्र आलापल्लीचे अंतर्गत कं.नं. ५८ (अहावन्न) मधील प्लॉनस्टेशनचे काम कोणत्या वर्षी करण्यात आले व किती हेक्टर मध्ये करण्यात आले. वन परिक्षेत्र अधिकारी, आलापल्ली यांचे सन २००८ ते २००९ च्या कॅशबुकच्या प्रती देण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.९.२००९ रोजी

... २

प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाचे नंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ व दिनांक १७.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना माहिती मिळाली होती ती विलंबाने मिळाली असा युक्तिवाद केला आहे. त्यावर दुपारी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपस्थित झाल्यावर माहिती देण्यास विलंब झाला हे मान्य आहे. परंतु सदरची माहिती ही वनपरिक्षेत्रातील माहिती असल्यामुळे संकलीत करण्यास विलंब होतो. तसेच त्यांचेकडे अपूर्ण कर्मचारी वर्ग व सर्व पदभार त्यांचेकडे असल्यामुळे त्यांनी विलंब मान्य केले आहे. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचा कोणताही उद्येश नव्हता किंवा टाळाटाळ करण्याचे कोणतेही कारण नव्हते. कारण माहिती ही श्री. चिंचाळकर यांचे कालावधीतील असल्यामुळे उपलब्ध करुन देण्याचा कोणताही हेतु नव्हता. प्लॉनस्टेशनच्या संदर्भातील त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. परंतु कॅशबुक मधील माहिती त्यांना दिली नाही व ती देता येणार नाही. कारण कॅशबुकमध्ये प्लॉनस्टेशनची माहिती असतेच असे नाही. इतरही सर्व प्रकारचा व्यवहार केलेला असतो. त्यामुळे मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपूरा कर्मचारी वर्ग व अधिकचा कार्यभार असल्यामुळे त्यांना माहिती विलंबाने दिली याबद्यल दिलगिरी व्यक्त केली असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ११००/२००९ व अपील क्रमांक ११०१/२००९ मध्ये माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २४.१२.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११०४/२००९.

श्री. माधवराव राजाराम कळाम,
डोंगरे पेट्रोलपंपामागे, चंद्रपूर रोड,
ता. जि. गडचिरोली. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. जी. मंथलवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

श्री. जी. एन. धारगावे,
जनमाहिती अधिकारी तथा
मंडळ कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, चामोर्शी यांचेकडे भारतीय जीवन विमा निगम, शाखा गडचिरोली यांचेकडून काढलेल्या पॉलीसी क्र. ९७२९७३१०४ व ९७३३०४६२४ चे खालील महिन्याचे वेतनातून रक्कम कपात करुन सुध्दा विमा कार्यालयात रक्कम भरलेली नाही. त्याबद्यलची संपूर्ण माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हवी असे त्यांनी नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ८.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर द्वितीय अपील दाखल केले.

... २

३.	जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे. "उपरोक्त विषयी अर्जदार श्री. माधवराव राजाराम कळाम, गडचिरोली यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत दिनांक ६.९.२००९ रोजी अर्ज दाखल करुन खालील माहितीची मागणी केली होती. त्यानुसार अर्जदारास माहिती पत्र क्रमांक ८२५, दिनांक २५.९.२००९ नुसार कळविले आहे. अर्जदारानी प्रथम अपील अर्ज दिनांक १४.१०.२००९ रोजी तत्कालीन अपीलीय अधिकारी यांचेकडे सादर केला. (अर्ज सोबत जोडलेला आहे) अर्जदारास अपीलीय अधिकारी म्हणून अर्जदारास पत्र क्रमांक ९१५, दिनांक ४.११.२००९ नुसार पत्र देऊन अपीलाच्या सुनावणीसाठी हजर राहण्याचे लेखी कळविले होते. तसेच दुरध्वनी संदेशान्वये संपर्क केला होता. (पत्र सोबत जोडले आहे) प्रथम अपीलीय सुनावणीस दिनांक १६.११.२००९ रोजी अर्ज सुनावणीस गैरहजर राहले. त्यानुसार पत्र क्र. ९५०, दिनांक १६.११.२००९ नुसार गैरहजेरीचे पत्र देऊन अर्ज निकाली काढण्यात आले. (अर्ज सोबत जोडलेला आहे) अर्जदारास पत्र क्र. ८२२, दिनांक २५.९.२००९ अन्वये अंतीम वेतन प्रमाणपत्र पाठविली आहे. (त्यांची प्रत सोबत जोडलेली आहे) अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चामोर्शी सध्याचे यांनी पत्र क्र. १०२०, दिनांक ४.१२.२००९ अन्वये मुळ सेवापुस्तक ना देय प्रमाणपत्र वेतन निश्चितीचे प्रपत्र नाहरकत प्रमाणपत्र पाठविले आहे. (त्याची प्रत सोबत जोडलेली आहे) पत्र क्र. ६९५, दिनांक १२.८.२००९ पत्र क्रमांक ८२५, दिनांक २५.९.२००९ तसेच पत्र क्रमांक १०२४, दिनांक ५.१२.२००९ अन्वये तत्कालीन आस्थापना लिपिक यांना देऊन भारतीय जीवन विमा निगम पॉलीसीचे पैसे भरण्याबाबत संबंधिताला देऊन रक्कमेचे भरणा करुन घेतले आहे. (पैसा भरणा केल्याची पावती सोबत जोडलेली आहे) सदर अपीलाबाबत विनंती की, अर्जदाराने माहिती मागणी कायदयानुसार माहितीची मागणी केली. परंतु निरंक आहे. म्हणून माहिती त्यांना देण्यात आली नाही. अपीलाचा सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्याची माहिती मागणी अपील निकालात काढण्यात आली. यावरुन आम्ही जनमाहिती अधिकारी व अपील अधिकारी यांनी कर्तव्यास कसूर केली नाही. तरी कोणतेही शास्ती लावण्यात येऊ नये. अपीलेस हवी असलेली माहिती अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस आम्ही माहिती देण्यास तयार आहो." वरील खुलाश्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे सर्व प्रकारचे निराकरण झालेले दिसून येते व तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २४.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११०९/२००९ व अपील क्रमांक १११०/२००९.

श्री. रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा,
नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक भूमी अभिलेख,
जुना बसस्टँड जवळ,
नाशिक प्रदेश, नाशिक.

श्री. जे. एस. अहिरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख,
जुना बसस्टँड जवळ,
नाशिक प्रदेश, नाशिक.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव,
ता.जि. जळगांव.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
ता. पाचोरा, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत.

प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. अपील क्रमांक ११०/२००९ मध्ये जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. सुरेश अहेर, सहाय्यक पोलीस निरीक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. सुधाकर वाघमारे, सहाय्यक पोलीस निरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००९ रोजी अपील क्रमांक ११०९/२००९ मध्ये शासकीय माहिती अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय, नाशिक यांचेकडे दिनांक १३.७.२००९ रोजी आपलेकडे श्री. साईनदास रघुनाथ वंजारी, निमतानदार, तालुका भूमी अभिलेख कार्यालय, मुक्ताईनगर हयांनी खोटे प्रतिज्ञापत्र देऊन शासनाची फसवणूक केली. त्याबद्यल आपण कोणती कार्यवाही केली हयाची माहिती हवी आहे. सदरची माहिती शिघ्र पोस्टाने हवी असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने पुन्हा माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचा अर्ज आल्यानंतर दिनांक १०.८.२००९ रोजी अधिक्षक भूमी अभिलेख, जळगांव यांचेकडे अर्जाची चौकशी करुन दिनांक ३१.८.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा असे आदेश दिलेले होते. दिनांक १४.१०.२००९ रोजी प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर राहावे असे कळविले होते. परंतु ते हजर राहिले नाही. तसेच अपीलकर्ता यांना माहितीचेकरिता दिनांक २९.८.२००९ रोजी रुपये २९/- चा भरणा करावा असे कळविले. त्यानंतर त्यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याची कोणतीही टाळाटाळ करण्यात आलेली नाही. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक १७.७.२००७ रोजी माहितीचा अर्ज नंतर त्यात खोडतोड करुन दिनांक २०.८.२००९ ची तारीख घातलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केलेला अर्ज व आयोगाकडे सादर केलेला अर्ज हे वेगवेगळया तारख घालून दिलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. एकूण अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

४. अपील क्रमांक १११०/२००९ मध्ये दिनांक १.६.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा यांचेकडे दिनांक २८.५.२००९ रोजी पोलीस स्टेशन, पिंपळगांव येथे अश्विनी वंजारी व इतर यांचे विरुध्द तक्रार अर्ज दिला होता. त्यावर कोणती कार्यवाही झाली त्याची माहिती हवी आणि त्यांची प्रत हवी. सदरची माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असले तरी त्यांनी दिनांक २०.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व द्वितीय अपील दाखल केले. चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी याच प्रकरणाचे संदर्भात आता पर्यंत अनेक अर्ज व अपीले त्यांनी निरनिराळया संदर्भात दाखल केलेले आहे व ती सर्व अपीले खारीज करण्यात आलेली आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा अधिकाऱ्यांना त्रास देण्याचा उद्येशाने केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे याकारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील क्रमांक ११०९/२००९ व अपील क्रमांक १११०/२००९ हे खारीज करण्यात येते.

.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २४.१२.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १११२/२००९.**

श्री. विजयकुमार मधुकर चौधरी,
प्लॉट नं. ९९, वाल्मीकनगर,
गोकुलपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विक्रीकर उपआयुक्त (आस्थापना)
अप्पर विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
नागपुर क्षेत्र, विक्रीकर भवन, सिव्हील लाईन,
नागपूर.

श्री. गिरीष विश्वासराव अक्कलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक विक्रीकर आयुक्त,
अप्पर विक्रीकर आयुक्तांचे कार्यालय,
नागपुर क्षेत्र, विक्रीकर भवन, सिव्हील लाईन,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी अप्पर विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालयामध्ये माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १६.५.२००८ रोजी दिलेल्या अर्जाचे संदर्भात काय कार्यवाही केली याची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २१.११.२००९ रोजी निर्णय

... २

दिलेला असून त्यात अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.११.२००९ चा दुसरा अर्ज विचाराधीन आहे. याचिकाकर्त्याने दुसरा अर्ज केलेला असल्याने व त्याला सदर याचिकेचा पाठपुरावा करावयाचा नसल्याने सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे. असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक नसलेला अर्ज सुध्दा केलेला होता व त्या अर्जाचे संदर्भामध्ये दिनांक २१.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा तक्रार अर्ज दाखल केलेला आहे व द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना त्यांच्या दादी श्रीमती ताराबाई मख्खन चौधरी हया शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्या व त्यांच्या जागेवर लाड व पागे समितीच्या अनुषंगाने नौकरीसाठी नियुक्ती मिळावी अशी त्यांची मागणी दिनांक १६.५.२००८ रोजी अर्ज करुन केलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ते पद रिक्त नसल्यामुळे त्यांना नियुक्ती देता येत नाही व श्रीमती ताराबाई मख्खन चौधरी हया सेवानिवृत्त झाल्या त्यावेळेस त्यांनी अर्ज केला नव्हता. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी स्वतः अर्ज केला होता. परंतु आतापर्यंत त्यांचे कार्यालयामध्ये अर्ज स्विकृती मध्ये नाही व प्रत पाठवावी व त्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा त्यांनी दिलेला नाही असे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.५.२००८ चा अर्ज आस्थापना शाखेमध्ये काय कार्यवाही झाली त्याबद्यलची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १६.५.२००८ च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती कागदपत्राची छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २४.१२.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०१४/२००९

१) श्री महेंद्र रामकृष्णराव शेंडे,
दयाल नगर, चंदन एस.टी.डी.जवळ, मेन देवळी रोड,
वर्धा. ता.जि. वर्धा. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ता.जि. वर्धा. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ता.जि.वर्धा. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष संनियंत्रण समिती, जिल्हा वर्धा यांचेकडे दिनांक १६.१.२००९ च्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती, तसेच संनियंत्रण समितीने आतापर्यंत किती बैठका घेतल्या, झालेली चर्चा, निर्णय, दिनांकासह लेखी अहवाल उपलब्ध करुन द्यावा, अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.६.२००९ रोजी या कार्यालयाचे पत्र दिनांक २९.१.२००९ अन्वये संबधीत उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडे चौकशी करुन अहवाल मागविला आहे. सदर्हु पत्राची एक पानाचे रुपये २/- शुल्क शासन कोषागारात भरावे व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी. त्यानंतर आपणास माहिती देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.८.२००९ रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आलेले असून**

**( पान २ वर..)**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी वर्धा यांनी आदेश पारित झाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १७.१०.२००९ रोजी जिल्हाधिकारी वर्धा यांचे कार्यालयातून उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना चौकशी अहवाल सादर करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २७.११.२००९ रोजी चौकशी अहवाल उपलब्ध झाला असे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरचा अहवाल उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

**आदेश**

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना, माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत, दिनांक २७.११.२००९ रोजीचे अहवालाची प्रत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी. त्यापूर्वी सदरची प्रत व्यक्तीशः उपलब्ध करुन दिलेली असल्यास तशी पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक १.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०१८/२००९

१) श्री किशोर रामचंद्र चिंचाळकर,
५३, गोविंदा गौरखेडे कॉम्प्लेक्स, सेमीनरी हिल्स,
नागपूर-४४०००६. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,
महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(विद्युत)
महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेकडे अनेक्झर-अे व अनेक्झर-बी मधील माहिती, रस्त्यावरील विजेच्या दिव्याच्या संदर्भात मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.७.०९ रोजी माहिती नगररचना यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे त्यांना कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.८.२००९ रोजी देण्यात आला असून विभागाचे म्हणणे असे आहे की, १७ street light चे मेंटेनंस ते करीत आहे. परंतु हे street light त्यांचेकडे मेंटेनंस साठी केव्हा आहे हे त्यांना माहिती नाही. जेव्हा लेआऊट म.न.पा.ला हस्तांतरीत केला जातो त्या वेळपासूनच हे काम विद्युत विभागाकडे येत असते. करीता विभागाने संबंधीत लेआऊट म.न.पा.स केव्हा हस्तांतरीत झाला या बाबत माहिती Estate/A.D.T.P. विभागाकडून १५ दिवसात घेऊन अपीलार्थीस दयावी या सूचनेसह प्रकरण निकाली काढण्यात येते, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, प्रत्यक्षात त्यांना माहितीची आवश्यकता नाही. परंतु त्यांच्या भागातील स्ट्रीट लाईटच्या संदर्भात सतत तक्रारी दाखल केलेल्या आहेत. व सदरचे स्ट्रिट ले आऊट हे योग्यरितीने देखभाल केले जात नाही. त्या संदर्भात सुध्दा तक्रारी दाखल केलेल्या आहे. परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही किंवा दखल सुध्दा घेतली जात नाही. त्यामुळे अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे जे जे लेआऊट येतात त्यांची ते देखभाल करतात.**

**( पान २ वर ..)**

**माहिती त्यांनी इस्टेट विभागाकडून उपलब्ध करुन घेतली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितलेली असल्यामुळे व ती माहिती घेण्यासाठी आलेले नसल्यामुळे माहिती उपलब्ध असूनही पुरविता आली नाही. आताही जी माहिती उपलब्ध आहे त्यात त्यांच्या लेआऊटचा समावेश दिसून येत नाही. त्यामुळे पुन्हा अर्धवट माहिती दिली अशी तक्रार येण्याची शक्यता आहे. परंतु जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देता येते. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती त्यांचेकडूनच विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी, अपीलकर्ता यांनी संपर्क साधल्यावर त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक १.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०२१/२००९

१) श्री जितेश गोविंदराव मात्रे,
मु.पो.पिपरी (पारगोठाण), ता.आर्वी, जि. वर्धा. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
लोअर वर्धा प्रकल्प पुनर्वसन वर्धा, ता.जि.वर्धा. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,
लोअर वर्धा पुनर्वसन आर्वी, प्रभाग क्रं.१, ता.आर्वी, जि.वर्धा. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लोअर वर्धा पुनर्वसन आर्वी यांचेकडे, नवीन पुनवर्सन पिपरी येथे झालेले बांधकाम, जमा खर्चाची हिशोबासह अहवाल वगैरे.. च्या संदर्भात एकुण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. आज अपीलकर्ता सुनावणीस हजर आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी, व जन माहिती अधिकारी हे हजर नाही. व त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द**

**( पान २ वर..)**

**शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.७.२००९ च्या अर्जाचे अनुषांगाने मुद्येनिहाय कागदपत्राच्या स्वरुपात माहिती विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**२) आयोगाचे दिनांक १८.११.२००९ चा नोटीसप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस हजर न झाल्याबाबत खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करावा अन्यथा रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक १.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०२२/२००९

१) श्री राजू राहूलकर,
शेठ प्रताप वार्ड, गर्ल्स कॅालेज रोड, गजानन स्टोर्स के सामने,
गोंदिया ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती सडक/अर्जूनी, ता.सडक/अर्जूनी, जि.गोंदिया. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव,
ग्राम पंचायत, उशीरखेडा, पो.शेनडा, ता.सडक/अर्जूनी
जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक १.१२.२००९)

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव, ग्राम पंचायत उशीखेडा यांचेकडे, मजूरांचे माग्रेटी पगारा बाबत, दिनांक १७.५.२००९ ते आज पर्यंतच्या कालावधीची माहिती एकुण ३ मुद्यांमध्ये मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १८.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हजर राहीले नाही म्हणून अपील खारीज केलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३०.६.२००९ चा अर्ज त्यांना प्राप्त झालेला नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सदरचा अर्ज ग्राम पंचायत शिपाई यांचे जवळ दिला होता व त्याची पोच आहे. परंतु अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या**

**( पान २ वर ..)**

**सुनावणीस हजर राहीले असते तर ही बाब त्यावेळेस स्पष्ट झाली असती व माहिती उपलब्ध झाली असती. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती आजही तयार आहे व ती उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे आजच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक १.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक ९६६/२००९

१) श्री धनंजय म. चित्रीव,
प्लॉट नं.-१२, प्रोसेस कॅालोनी, स्वावलंबीनगर,
नागपूर-२२. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी ,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई-४००००१. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅंक ऑफ इंडिया इमारत,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई-४००००१. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. आज अपीलकर्ता हजर आहेत. परंतु, अपीलकर्ता दिनांक १७.११.२००९ रोजी हजर होते. उत्तरवादी हजर आहेत. परंतु उत्तरवादी यांनी फॅक्स द्वारे आयोगाकडे खुलासा सादर केला आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे डॅा. सुभाष तितरे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शानिक्रं.१०९५/१४४९/प्र.क्र.३१०/सेवा-३, दिनांक ९.९.१९९६ निवड/नियुक्त कोणते जातीचे आधारावर केलेली आहे. (२) त्याकरीता डॅा. सु.ग. तितरे यांनी कोणते जातीचे प्रमाणपत्र जातीचे मुळ वैद्यता प्रमाणपत्र शासनास/आयोगास सादर केले आहे. त्याबाबत माहिती व आयोगास सादर प्रमाणपत्राची (सर्वच) सत्यप्रत/प्रमाणित प्रत माहितीचे अधिकार कायदा नुसार योग्य त्या मुदतीत देण्यात यावी, ही विनंती, अशी माहिती टपालाने देण्यात यावी, म्हणून मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २३.७.२००९ रोजी दोनही मुद्यांच्या संदर्भात अर्थबोध होत नसल्यामुळे वस्तुस्थिती त्यांना कळविण्यात आलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता आज गैरहजर आहे. उत्तरवादी यांनी फॅक्सद्वारे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासाः**

**" डॅा. तितरे यांची शिफारस आयोगाने नेमकी कोणत्या पदासाठी केलेली होती ते माहिती अधिकारात माहिती मागविताना डॅा. चित्रीव यांनी कळविलेले नसल्यामुळे त्यांच्या पत्रात नमूद शासन निर्णयाद्वारे डॅा. तितरे**

**( पान २ वर ..)**

**यांची शिफारस कोणत्या जातीच्या राखीव पदावर केली आहे ही माहिती देणे शक्य नसल्याचे तसेच आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे मुळ अर्ज व त्यासोबत जोडलेली सर्व कागदपत्र शासनाच्या संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येतात अशी माहिती डॉ. चित्रीव यांना दिनांक २३ जुलै, ०९ च्या पत्राद्वारे आयोगातर्फे कळविण्यात आले होती. तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीस त्यांना दिनांक १ ऑक्टोबर, २००९ रोजी उपस्थित राहण्यास आयोगाच्या दिनांक १६ सप्टेंबर, २००९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सुलभ संदर्भाकरीता सदर पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. सदर अपीलाच्या सुनावणीस ते उपस्थित राहीले नाहीत व आता परस्पर त्यांनी आपणाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. म्हणून आपण डॉ. चित्रीव यांना आयोगाच्या अपीलीय अधिका-यांपुढे सुनावणीसाठी पाठवावे अशी आपणास विनंती आहे. आयोगाच्या अपीलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने डॉ. चित्रीव यांचे समाधान न झाल्यास आपण द्वितीय अपीलाची सुनावणी ठेवणे यथोचित होईल."**

**त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहिल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकतील.**

आदेश

**१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत घ्यावी व त्याकरीता अपीलकर्ता यांना सुनावणीची नोटीस पाठविण्यात यावी. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस पाठविल्यानंतर अपीलकर्ता यांनी सुनावणीस हजर राहून माहितीच्या संदर्भात तपशिल देवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -

तक्रार क्रमांक १५०/२००९

१) श्री नथ्थू अमृतराव मडावी,
रा.नवतळा, ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. तक्रारकर्ता

वि रु ध्द

२) जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
सा.क्रं.२८, नवतळा, रा.नि.मंडळ, शंकरपूर,
ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. गैरतक्रारदार

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

<u>नि र्ण य</u>

**तक्रारकर्ता यांनी दिनांक २७.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून तलाठी, सा.क्रं.२८, नवतळा, रा.नि.मंडळ, शंकरपूर, ता.चिमूर यांचेकडे मौजा नवतळा येथील गट नं.१० च्या जागेचा फेर फार आपल्या रेकॉर्डला मरघट ऐवजी सरकार असा कधी झाला या संबंधीची माहिती मिळण्याबाबत, यासंबंधीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून मात्र दिनांक २०.६.२००९ रोजी तलाठी यांनी सन १९८५-८६ मध्ये तलाठी कार्यालतयात नवतळा येथे घेतलेल्या फेर फारची नोंद पंजी उलपब्ध नाही. ती तहसिल कार्यालय चिमूर येथे दाखल झाली आहे, तेथून घ्यावी असे कळविलेले दिसून येते व सध्या चालू रेकॉर्डची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार यांनी सदरची माहिती तहसिल कार्यालय, चिमूर येथून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतु तक्रारदार यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे जे उत्तर दिलेले आहे ते विलंबाने आहे. कागदपत्रांचे अवलोकन केले असता तलाठी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे तलाठी सा.क्रं.२८, नवतळा, तालुका चिमुर यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक ठरते. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

**( पान २ वर..)**

आदेश

**१)    तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तलाठी तथा जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही ही तहसिलदार, चिमूर यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने तहसिलदार, चिमूर यांना पाठविण्यात यावी.**

**२)    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०७०/२००९

१) श्री महादेव दमडुजी साठवणे,
प्लॉट नं.१, मानेवाडा रोड, बजरंग नगर, नागपूर. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,
महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त/वार्ड अधिकारी,
महानगर पालिका, हनुमान नगर, झोन क्रमांक-३, नागपूर. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्री अे.एस. भेंडारकर हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे भूमापन क्रं.११/१ न.भू.क्रं.१५९६ आराजी १.२० एकर पैकी ०.३० डिसमील जागेवर पश्चिम दिशेला महानगर पालिकेचे होत असलेले नाली व भिंतीचे सिमेंट कांक्रीटचे बांधकाम वार्ड नं. १०४ बजरंग नगर, नागपूर. Misc.Civil Appeal No.१०६/२००८ व १०७/२००८ मध्ये मा. न्यायाधिश यांनी दिलेला निकाल ता. ८.७.२००८ हा भूमापन क्रं. ११/१ न.भू.क्रं.१५९६ संबंधी आहे काय. असल्यास संबंधीत निर्णयाची प्रमाणित नकल देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.७.२००९ रोजी निकालाची नक्कल देण्यात आलेली असून समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.८.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती दिलेली असल्यमुळे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. युक्तीवाद करताना अपीलकर्ता यांचे वकील यांनी सांगितले की, जी नक्कलची प्रत**

**( पान २ वर..)**

**दिलेली आहे त्यात ११/१ भूमापन क्रमांकाचा उल्लेख दिसून येत नाही. परंतु मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी Misc.Civil Appeal No.१०६/२००८ व १०७/२००८ च्या निर्णयाची प्रमाणित नक्कल देण्यात यावी अशी मागणी केलेली दिसून येते. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यात भूमापन क्रं. ११/१ चा उल्लेख नाही. परंतु अपीलकर्ता यांना, भूमापन क्रं. ११/१ चा उल्लेख नसला तरी सदरचे बांधकाम हे . Misc.Civil Appeal No.१०६/२००८ व १०७/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणेच करण्यात येत आहे. तसेच अपीलकर्ता यांचे आणखी न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहे, असे त्यांनी आयोगास सांगितले. कारण अपीलकर्ता हेच न्यायालयत गेले होते. त्यामुळे त्यांना त्याबध्दलची पुर्ण माहिती आहे. त्यामुळे माहिती उलपब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०६८/२००९

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-३४. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव, ता.जि. जळगांव — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय कार्यालय मुक्ताईनगर, जि. जळगांव. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे सौ. सुमित्रा साईनादास वंजारी व अश्विनी साईनदास वंजारी हया दोघीही मायलेकीनी खोटे, बोगस एफ.आय.आर.पो.स्टे. मुक्ताईनगर येथे नोंदवून पोलीसांकडून एन.सी. घेतल्या आहेत. त्याबध्दल आपणाकडे अर्ज केला होता. खोटे रिपोर्ट केल्याबध्दल त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली त्याची माहिती हवी. सर्वांचे पुरावे सोबत जोडले आहे त्या तारखाप्रमाणे., अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून पुन्हा दिनांक १.६.२००९ रोजी, दिनांक २२.५.२००९ च्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली आहे अशी विचारणा केलेली दिसून येते. परंतु त्यानुसारही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दिनांक २२.९.२००९ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.१०.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती**

**( पान २ वर ..)**

**आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक २९.६.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्यांच्या तक्रारीत कोणत्याही प्रकारचे तथ्य नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही, असेही त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा त्यांच्या दिनांक २२.५.२००९ रोजी पोलीस स्टेशन मुक्ताईनगर येथे सौ. सुमित्रा वंजारी व अश्विनी वंजारी यांचे विरुध्द तक्रार दिली. त्यावर**

**झालेल्या कार्यवाहीची माहिती पुरविणे संयुक्तिक राहील, त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.६.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने हा माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २२.५.२००९ च्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती पुरविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०६९/२००९

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-३४. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
होम्योपॅथीक मेडीकल कॅालेज अॅड हॅास्पीटल, निमझरी रोड, शिरपूर,
जिल्हा धुळे-४२५४०५. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी
होम्योपॅथीक मेडीकल कॅालेज अॅड हॅास्पीटल, निमझरी रोड, शिरपूर,
जिल्हा धुळे-४२५४०५. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०६९/२००९ व अपील क्रमांक ९४६/२००९ हे एकच असल्यामुळे व वरील अपील क्रमांक ९४६/२००९ मध्ये दिनांक ९.११.२००९ रोजी निर्णय झालेला असल्यामुळे पुन्हा त्याच अपीलाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक ९९५/२००९

१) श्री रमेश रामजी राठोड,
२०, विज्ञान नगर, मानेवाडा, नागपूर-४४००३४. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
९ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस(व्हीटी) समोर,
मुंबई-४००००१. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग,
९ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस(व्हीटी) समोर,
मुंबई-४००००१. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २४.५.२००९ रोजी माहिती अधिकारान्वये अर्ज केला. पुन्हा आज दिनांक २७.६.०९ रोजी अर्ज करीत आहे. रामदास राठोड विरुध्द केलेल्या तक्रारीचे काय झाले हयाची माहिती हवी, अशी माहिती शिघ्र टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.७.२००९ रोजी अपीलकताृ यांना सदरची तक्रार सुनावणीसाठी ठेवण्यात आली आहे व सदस्य यांचे स्विय सहायक यांचेशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वी पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडून अहवाल मागवावा अशी पत्राची प्रत त्यांना पाठविलेली दिसून येते. यावरुन त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात होत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कोणत्याही प्रकारे सुनावणीची तारीख आलेली**

**( पान २ वर ..)**

**नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, सुनावणी ही सदस्य व त्यांचे स्विय सहायक हे लावत असते. त्यामुळे ती माहिती त्यांचेकडून उपलब्ध होऊ शकते. असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती संकलीत करुन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मानवी हक्क आयोग व त्यांचे प्रबंधक व सदस्य हे एकच सार्वजनिक प्राधिकरण आहे. व त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिका-यांनी प्राधिकरणातील इतर शाखेकडून माहिती संकलीत करुन अर्जदारास उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. व ती माहिती पी.ए.कडून उपलब्ध करुन घेवून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना तक्रारीच्या सुनावणीच्या संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक ९८४/२००९

१) श्री पँथर यशवंत बळीराम अंबागडे,
मु.पो.सिर्सी, ता.उमरेड, जि. नागपूर-४४१२१४. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी ,
ग्रामीण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी,
ग्रामीण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी, ग्रामीण विकास विभाग हे गैरहजर आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी, ग्रामीण विकास विभाग हे गैरहजर आहेत. मात्र त्यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. आज सुनावणी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नियोजन(रोहयो) हजर आहे.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रधान सचिव, ग्रामीण विकास विभाग कार्यालय, मुंबई यांचेकडे, दिनांक १७.२.२००९ रोजी मा.प्रधान सचिव, ग्रामीण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सिर्सी विरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदाराचे निवेदनावर घेतलेल्या निर्णयासहीत केलेली कार्यवाही त्यासंबंधी विविध पत्रव्यवहार, खुलासे, अहवाल व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्य प्रती पूरविण्याची व्यवस्था करावी तसेच प्रथम अपीलीय प्राधिका-याचे नांव, पदनाम व संपूर्ण पत्याची माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.८.२००९ रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी, ग्राम विकास विभाग यांचेकडे दाखल केलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे पत्र मिळालेले नाही किंवा माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी(नियोजन विभाग) यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जे निवेदन दिलेले होते त्या निवेदनाचा विषय हा रोहयोच्या संदर्भात असल्यामुळे ते नियोजन विभागाकउे हस्तांतरीत करण्यात आले होते. त्यामुळे ग्राम विकास विभागाने सदरचा अर्ज सुध्दा हस्तांतर करावयास पाहिजे होता. परंतु तो न करता प्रथम अपील हस्तांतरीत केले. परंतु नियोजन विभागाकडे माहितीचा अर्ज केलेला नसल्यामुळे प्रथम अपील हे पुन्हा ग्राम विकास विभागाकडेच परत पाठविण्यात आले. व त्यानंतर अर्ज हा पुन्हा नियोजन विभागाकडे हस्तांतर**

**( पान २ वर ..)**

**केला.**

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने झालेली कार्यवाही म्हणजेच अपीलकर्ता यांच्या निवेदनावर जिल्हाधिकारी नागपूर यांनी पुढील कार्यवाही करावी असे आदेश दिलेली दिसून येते. तसेच परस्पर माहिती अपीलकर्ता यांना द्यावी असेही आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे दिसून येते की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती आतापर्यंत उपलब्ध झाली नाही. मुहात अपीलकर्ता यांनी निवेदन, माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपील हे योग्य त्या विभागाकडे केलेले नसल्यामुळे विलंब झालेला दिसून येतो. असे असले तरी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज हा त्यांचेकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांचे आंत संबंधीत नियोजन विभागाकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतु दोन महिन्यानंतर हस्तांतर केलेला दिसून येतो. यावरुन ग्रामीण विकास विभागातील अवर सचिव यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. व त्यामुळे ते दोषी आढळून येतात. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी जिल्हाधिकारी नागपूर यांना निवेदनावर कार्यवाही करण्यास कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या अर्जाचे संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात जावून माहिती मागणे उचित राहील. व त्याकरीता अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत कक्ष अधिकारी, नियोजन विभाग यांचे पत्र क्रं.२००९/४३/रोहयो/८, दिनांक ३ मार्च, २००९ च्या पत्राप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती, जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०५६/२००९

१) श्री प्रा.प्रेमचंद राघोजी बोंदाडे,
   २०१, कामगार कॅालोनी, नागपूर-२२ — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,
   महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक(स्लम विभाग)
   महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २१.१२.२००९)

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, कामगार कॅालोनी व तुकडोजी नगर या वसाहतीचे मालकी हक्काचे पटटे वाटप जेव्हापासून ते वास्तव्य करीत आहेत त्या वेळेच्या बाजार भावाने पैसे वसुल करुन तसेच एकुण किंमतीच्या १० टक्के मागासवर्गीयांना सुट ही योजना शासनाच्या ज्या आदेशानुसार किंवा अन्य मार्गाने त्या अध्यादेशाची सत्य प्रतिलीपी मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.९.२००९ रोजी अतिरिक्त खर्चासाठी रुपये १४/- चा भरना करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना मात्र शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. व त्यामध्ये १० टक्के सवलत असलेली शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलाचे कारण दिलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक ५.१०.२००९ रोजी दैनिक लोकमत वृत्तपत्रात दिनांक १३.८.२००९ रोजी प्रसिध्द बातमीपत्रात राज्य शासनाच्या नियमानुसार झ ाोपडपटटीवासीयांना जमीनीचे पैसे द्यावे लागतील. जेव्हापासून ते वास्तव्यास आले तेव्हाच्या बाजारभावाप्रमाणे पैसे सरकारला देणे बंधनकारक राहाणार आहे. त्यात मागासवर्गीयांना एकुण किंमतीच्या १० टक्के सवलत मिळेल, असे कोणतेही राजपत्र या कार्यालयात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. त्यानंतरही दिनांक १५.१०.२००९ रोजी जनसंपर्क अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांचेकडून प्राप्त माहिती नुसार अशा प्रकारचे वृत्त देण्यात आलेले नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १६.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.**

**( पान २ वर ..)**

**प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.१०.२००९ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. सुनावणीच्या वेळी सुध्दा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, १० टक्के सवलतीचा जी.आर. उपलब्ध झालेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, असा जी.आर. ज्यांचे कार्यालयात आज उपलब्ध नाही. अपीलकर्ता यांनी वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे माहिती मागितलेली दिसून येते. तरी सुध्दा त्यांचे म्हणणे असे आहे की, तशा प्रकारचा जी.आर.आहे व ते देत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी सदरचा जी.आर. सादर करतो असे आयोगास सांगितले. त्याकरीता त्यांना दिनांक १७.१.२००९ रोजी जी.आर.ची प्रत आयोगास सादर करावी असे आदेश दिलेले आहे. असे असल्यामुळे सदरचे अपील हे प्रलंबित ठेवण्यात येत आहे.**

नागपूर
दिनांक २१.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०९६/२००९

१) श्री उमेश बाजीराव कुकडे,
मु.पो.कुनघाडा (रै.), ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी(उ.श्रे.)
पंचायत समिती, चामोर्शी, ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी
पंचायत समिती, चामोर्शी, ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक ३.१२.२००९ अन्वये मा.संवर्ग विकास अधिकारी(उ.श्रे.) पंचायत समिती, चामोर्शी यांचेकडे, त्यांचा दिनांक ५.८.२००९ चे माहिती अर्ज व १४.९.२००९ चे अपील मागे घेत आहे. यात माझी कोणतीही उजर तक्रार राहणार नाही असे लेखी दिलेले असून सदरच्या पत्राची सत्यप्रत उत्तरवादी यांनी आयोगाकडे दाखल केली आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी अपील मागे घेत असल्याचे लिहून दिलेले असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यांत येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०९२/२००९

१) श्री मधुकर रामभाऊ राऊत,
मु.पो.वाढोणा, ता.आर्वी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी(उ.श्रे.)
पंचायत समिती, आर्वी, ता.आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी
पंचायत समिती, आर्वी, ता.आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. जन माहिती अधिकारी यांनी, अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असून याबाबतची कोणतीही तक्रार राहीलेली नाही असे त्यांचे पत्र दिनांक २३.१२.२००९ अन्वये आयोगाकडे लेखी दिलेले असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यांत येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०९९/२००९

१) श्री राजेंद्र तानबाजी सतई,
साई प्रसाद, ६९, महालक्ष्मी नगर नं.-३,
गल्ली नं.३, मानेवाडा रोड, नागपूर. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर,धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नागपूर.
८,सहकार सदन, हिंदुस्थान कॅालनी, अमरावती रोड, नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे कार्यालयात, नागपूर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. नागपूर यांचेकडून सन २००२ ते २००६ पर्यंतच्या अंकेक्षण अहवाल, याच काळातील संस्थेचे पदाधिकारी तसेच अधिकारी वर्गाने उचल केलेल्या प्रवास भत्ता देयकाच्या प्रती, कर्मचारी सेवा जेष्ठता यादी, बिंदू नामावली. दिनांक १.४.२००२ ते ३१.३.२००६ या कालावधीतील माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.९.२००९ च्या पत्रान्वये रुपये ३१६/- शुल्काचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविलेले दिसून येते व इतर ३ मुद्यांवरील माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत कळविलेले आहे. मात्र मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.११.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाचे स्तरावरील असलेली माहिती अर्जाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही केलेली आहे. मुद्या क्रमांक २, ३ व ४ ची माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत कळविले आहे व त्यामुळे अपील फेटाळण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र त्यांना मिळालेले नाही. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे कार्यालयात सुध्दा**

**(पान २ वर..)**

**दाखविले नाही. परंतु आयोगाचे निदर्शनास आणलेले असल्यामुळे सदरच्या पत्रामध्ये मागणी केलेली शुल्काची रक्कम भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक आहे. उर्वरित माहिती ही संस्थेकडून मागवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मधील "माहिती" "या संज्ञेच्या व्याख्येमध्ये माहिती याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज,**
**ज्ञापने.. व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायदयामुळे सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती याचा समावेश होतो." यावरुन सहकारी संस्था यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदीप्रमाणे ती माहिती ही जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयाने उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविणे हे वरील व्याख्येप्रमाणे वैधानिक राहील. अन्यथा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे उपनिबंधक यांचे आदेश पालन झाले नाही म्हणून योग्य ती कार्यवाही सहकारी संस्थेच्या विरुध्द त्यांना करता येईल व त्यामुळे सदरची माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहितीच्या अतिरिक्त शुल्काचा भरणा करुन जन माहिती अधिकारी, उपजिल्हा निबंधक कार्यालय यांचेकडून अंकेक्षण अहवाल प्राप्त करुन घ्यावा.**

**२) जन माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. यांचेकडून मुद्या क्रं. २, ३ व ४ ची माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्या माहितीचा खर्च हा अपीलकर्ता यांनी करावयाचा आहे. माहिती उपलब्ध करुन न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०९८/२००९

१) श्री सुरेश रामभाऊ कुहीकर,
मु.पो.सिर्सी, ता.उमरेड, जिल्हा नागपूर-४४१२१४. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, नागपूर, ता.जि. नागपूर. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद नागपूर. ता.जि. नागपूर. — उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी त्यांच्या दिनांक १४.९.२००९ च्या तक्रारीच्या संदर्भात झ ालेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचेकडे मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ३०.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ९.१०.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (मा.) यांनी अध्यक्ष लोकसेवा शिक्षण संस्था सिर्सी ता. उमरेड यांचेकडे तक्रार अर्जाचे हस्तांतर करुन त्याबाबत चौकशी करुन योग्य ते शासन करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न**

**झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे म्हणण् असे आहे की, त्यांनी दिनांक १४.७.२००९ रोजी शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रार अर्ज दिलेला होता. वास्तविक सदरच्या तक्रार अर्जाप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी चौकशी करुन संस्थेला निर्णय कळविणे आवश्यक होते. परंतु शिक्षणाधिकारी यांनी चौकशी न करता तक्रार अर्ज हा अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी यांचेकडे पाठविला. परंतु त्यांनी**

**( पान २ वर ..)**

**कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना अंतिमतः माहिती उपलब्ध झ ाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी तक्रार शिक्षणाधिकारी यांचेकडे केलेली आहे त्याची चौकशी शिक्षणाधिकारी यांनी करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.७.२००९ च्या तक्रार अर्जाची चौकशी ही शिक्षणाधिकारी (मा.) यांनी करुन अपीलकर्ता यांना चौकशीच्या अंतिम निर्णयाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील - अपील क्रमांक १०९३/२००९

अपील क्रमांक १०९४/२००९

१) श्री राजेश काशिनाथ मासुरकर,
१६८, ओमनगर, नागपूर-९. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
उज्वल माध्यमिक विद्यालय, मिरे ले आऊट, नागपूर-९. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपील क्रमांक १०९३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे उज्वल विद्यालय नागपूर आस्थापनेत कार्यरत शिक्षिका कु. मिना विश्वनाथ भांडारकर यांचे जुलै, १९९४ ते सप्टेंबर, २००९ पर्यंत मंजूर वेतनाचा तपशिलवार तक्ता (प्रमाणित), अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी अशा प्रकारचा कोणताही तक्ता या शाळेत उपलब्ध नाही. कु. मिना विश्वनाथ भांडारकर यांचे नांव समाविष्ट असलेले दर महिन्याचे वेतन देयक या कार्यालयात उपलब्ध आहे. आपण त्या देयकाची मागणी करु शकता. त्यावरुन आपण स्वतः तक्ता तयार करु शकाल. यासंबंधाने चर्चा करण्यासाठी आपण जन माहिती अधिका-यांना त्यांच्या कार्यालयीन वेळात भेटून चर्चा करु शकता म्हणजे आपणास पाहिजे असलेल्या माहितीसंबंधाने तोडगा निघू शकेल, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २२.१०.२००९ व दिनांक २८.१०.२००९ रोजी सुध्दा मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पत्रे दिलेली आहेत. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.**

**३. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २१.११.२००९ रोजी शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी ३ पत्रे दिलेली असल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येत नाही. मात्र विशिष्ट तक्त्यात माहिती उपलब्ध नाही**

**( पान २ वर ..)**

**व ती वेतन देयकाची माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांनी आयोगास सांगितले. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

**५. अपील क्रमांक १०९४/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी कार्यालय यांचेकडे उज्वल माध्यमिक विद्यालय, नागपूर यांचेकडे सन १९९३ ते १९९७ या कालावधीतील (१) मान्यता प्रस्ताव क्रं. ९०/९६, दिनांक २२.२.९६, (२) प्रस्ताव क्रं. १४२/९६, दिनांक ५.१०.९६ व (३) प्रस्ताव क्रमांक १५२/९६ दिनांक २१.११.९६, (४) सुधारित आदेशZPN/शिक्षण/मंजूरी/शिबीर/क्यू/९६/४२३१ दिनांक १८.२०.३.९६ (५) राजेश मासुरकर यांचे अप्रशिक्षित व प्रशिक्षित नियुक्ती पत्र, शाळा समिती ठराव व मान्यता प्रस्ताव व दिनांक ५.८.९३ पासून H.M. पदावर मान्यता आहे. मु.अ. पदास ५ वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र व शिक्षण विभागाची मान्यता होती का. (अनुभव प्रमाणपत्र व Discharge प्रमाणपत्र प्रमाणित प्रत) अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी कार्यालय (मा.) यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश मुख्याध्यापक यांना दिलेले दिसून येते. परंतु मुख्याध्यापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**६. सदरची माहिती ही संस्थेची माहिती आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.व त्यामुळे सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. संस्थेकडून माहिती उपलब्ध न झाल्यास संस्थेविरुध्द योग्य ती कारवाई करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०९३/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून कु. मिना विश्वनाथ भांडारकर यांचे नांव समाविष्ट असलेले वेतन देयकाची छायांकित प्रत उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी**

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०९४/२००९ मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी, कार्यालय, शिक्षणाधिकारी (मा.), शिक्षण विभाग यांनी उज्वल विद्यालय, नागपूर किंवा संस्था यांचेकडून संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेवून, हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे**

**( पान ३ वर ..)**

**आंत अपीलकर्ता यांनी पुरवावी. तसे न केल्यास दोनही अपीलातील जन माहिति अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०९७/२००९

१) सौ. निकिता एन. सुकारे,
निर्मल बंगला, विद्यानगर कॅालनी, भंडारा,
ता.जि. भंडारा-४४१९०४. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, भंडारा, ता.जि. भंडारा. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,
मिशन हायस्कुल, गणेशपूर भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २३.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) संस्थेने आपल्या कार्यालयास सादर केलेल्या डॅा. आशिष भेलवा सेक्रेटरी असल्याबाबतचे मा. धर्मदाय आयुक्त, मुंबई यांच्याकडून मंजूर झालेला अनुसूचित १ ची प्रत. (२) श्रीमती त्रिवेदी खिस्ती यांची पुर्ननियुक्ती केल्याबाबत आपल्या कार्यालयास सादर केलेला संस्थेचा आदेश व (संस्थेची ठरावाची प्रत) (३) संस्था अल्पसंख्यांक असल्याबाबतचे संस्थेने कार्यालयास सादर केलेले कागदपत्र. (४) संस्था अल्पसंख्यांक असल्यास संस्थेने शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचेकडे पदे भरण्याबाबत मागणी केल्याचा प्रस्ताव."**

**अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.९.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वर्ग-२ कार्यालय शिक्षणाधिकारी (मा.) यांनी मुख्याध्यापक मिशन हायस्कुल यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १४.१०.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी चारही मुद्यांवर माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना कळविल्यामुळे त्यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.११.२००९ रोजी देण्यात आला असून सौ. निकिता नितीन सुकारे भंडारा यांनी मागणी केलेली अनुक्रमांक १ ते ४ मुद्यांवरील माहिती संस्थेकडून प्राप्त करुन १५ दिवसांचे आंत प्राप्त करुन दयावी. अन्यथा संस्थेचे देय असलेले वेतनेत्तर अनुदान माहिती देईस्तोपर्यंत रोखण्यात येईल, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही**

**( पान २ वर ..)**

**म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यांनी अल्पसंख्यांक संस्थेचे प्रमाणपत्र मागितले असता त्याऐवजी उच्च न्यायालयाचा निर्णय दिलेला आहे. परंतु चेंज रिपोर्ट पुर्ण करुन दिलेला नाही. परंतु, माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिली जाते. उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शिक्षणाधिकारी यांचे पत्र आल्यावर त्यांनी संस्थेकडे रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. व संस्थेने जी माहिती उपलब्ध करुन दिली, ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उर्वरित माहिती मात्र अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली नसल्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी सदरची माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी, कार्यालय, शिक्षणाधिकारी (मा.) हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २३.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक ११११/२००९

१) श्री महेश सचानंद देवानी,
जयस्तंभ चौक, सोनाली रोडवेज जवळ,
गोंदिया ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा व्यवस्थापक,
तेलंगखेडी रोड, सिव्हील लाईन, नागपूर-०१. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा दुग्धशाळा व्यवस्थापक,
शासकिय दुध योजना गोंदिया, ता.जि. गोंदिया. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी त्यांचे पत्र दिनांक २४.१२.२००९ अन्वये अपील संदर्भात त्यांची काही तक्रार नाही करीता अपील अर्ज मागे घेत आहे, असे आयोगास लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १०४३/२००९
अपील क्रमांक १०४४/२००९

<u>अपील क्रमांक १०४३/२००९</u>

१) श्री अनिल देवाजी गायकवाड,
C/o वालोदे गुरुजी, विद्या वार्ड, मु.पो.ता.सडक/अर्जूनी
जिल्हा गोंदिया-४४१८०७. अपीलकर्ता

<u>अपील क्रमांक १०४४/२००९</u>

१) श्री दिवाकर मालोजी कांबळे,
C/o बाबुरावजी दहिवले, गणेश वार्ड, मु.पो.ता.सडक/अर्जूनी
जिल्हा गोंदिया-४४१८०७. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
वैनगंगा बहुउद्येशिय विकास संस्था, नागपूर,
१० कॉर्पोरेशन कॅालोनी, उत्तर अंबाझरी मार्ग,-नागपूर-४४००३३. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी
वैनगंगा बहुउद्येशिय विकास संस्था, नागपूर,
१० कॉर्पोरेशन कॅालोनी, उत्तर अंबाझरी मार्ग,-नागपूर-४४००३३. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोनही व्दितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या व्दितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलात दिनांक ३१.८.२००९ रोजी अनुक्रमे जन माहिती अधिकारी यांचेकडे वैनगंगा बहुउद्येशिय विकास संस्था नागपूर यांच्या व्यवस्थापन मंडळाची दि. ३०.४.२००९ व दि. १२.५.२००९ रोजी माझ्या सेवामुक्ती आदेशासंबंधाने सभा झाल्याचे संस्थेच्या पत्रावरुन कळते. सदर दोन्ही दिवशी झालेल्या सभांमधील ठरावाच्या मुळ प्रतीच्या प्रमाणित झेरॅाक्स प्रती देण्यात याव्या. तसेच वैनगंगा बहुउद्येशिय विकास संस्था नागपूर यांच्या व्यवस्थापन मंडळाची दि. १२.५.२००९ व दि. २४.५.२००९ रोजी माझ्या सेवामुक्ती आदेशासंबंधाने सभा झाल्याचे संस्थेच्या पत्रावरुन कळते. सदर दोन्ही दिवशी झालेल्या सभांमधील ठरावाच्या मुळ प्रतीच्या प्रमाणित झेरॅाक्स प्रती देण्यात याव्या अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ६.१०.२००९ रोजी दोनही अपीलकर्ता यांनी दोनही प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोनही व्दितीय अपीले**

**( पान २ वर ..)**

**दाखल केलेली दिसून येते.**

**३. संस्था अध्यक्ष यांचे आक्षेप व उत्तर त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले आहेत ते खालीलप्रमाणे-**

**"१. वैनगंगा बहुउद्येशीय विकास संस्था ही मुबई सार्वजनिक संस्था नोंदणी कायदयान्वये नोंदणीकृत संस्था आहे. सदरहू संस्थेला सरकार कडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. आमची संस्था ही माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत अंतर्भूत होत नाही. त्यामुळे सदरहू कायदा आमच्या संस्थेस लागू होत नाही. (२) आमची संस्था माहितीचा अधिकार कायदा अंतर्गत येत नसल्यामुळे संस्थेत माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त केलेला नाही त्यामुळे अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नांवे केलेले माहितीचा कायदा अंतर्गत केलेल्या अर्जानुसार मागितलेली माहिती पुरविण्यात आली नाही यात संस्थेचा कोणताही वाईट हेतु नव्हता व नाही. खाजगी संस्था ही माहितीचा कायदा २००५ अंतर्गत येत नाही या संबंधाने माननीय मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ नागपूर न्यायमुर्ती श्री ए.बी. चौधरी यांनी, नगर युवक शिक्षण संस्था नागपूर व इतर विरुध्द महाराष्ट्र स्टेट इनफॉरमेशन कमिशन नागपूर व इतर या केस मध्ये निकाल पारित केलेला आहे. सदरहू केसचा निकाल २००९(६) महा.लॅा.जर्नल ८५ यामध्ये आलेला आहे. सदरहु निकालाची प्रत सोबत जोडली आहे. (३) संदर्भीय निर्णयानुसार उत्तरवादी संस्था ही माहितीचा अधिकार कायदा २००५ च्या कक्षात येत नसल्यामुळे अपीलार्थीने केलेली अपील माननीय राज्य माहिती आयोगापुढे चालविण्यास योग्य नाही व ती फेटाळण्यात यावी."**

**४. वरील खुलाशावरुन सदरची संस्था ही खाजगी संस्था असल्यामुळे व त्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नसल्यामुळे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १०४३/२००९ व अपील क्रमांक १०४४/२००९ खारीज करण्यात येत आहेत.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील - अपील क्रमांक १११३/२००९

१) संगीता एस. मडावी,
ग्रामीण रुग्णालय परिसर-चिचगड, ता.देवरी,जि.गोंदिया. अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा. ता.जि. भंडारा. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००९ व दिनांक १४.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा निवड मंडळ तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे लोकमत वर्तमान पत्रात दिनांक १०.६.२००९ ला सरळ सेवा भरती अंतर्गत आरोग्य सेविका नियुक्तीबाबत दिलेल्या जाहिराती अनुसार दिनांक १०.६.२००९ पासून दिनांक ११.७.२००९ अथवा सदर नियुक्त प्रक्रिया निश्चिती आदेश व निर्णयाची स्पष्ट साक्षांकित छायाप्रत टपालाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. त्यावर त्यांना कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे अशी विचारणा दिनांक १८.७.२००९ रोजी करण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिका-याकउे आक्षेप घेणारे पत्र दिले आहे. त्यावर दिनांक ४.८.२००९ रोजी प्रशासकिय अधिकारी यांनी आपणास कोणत्या नवीन कायद्यानुसार तरतुदी पाहिजे याचा उल्लेख नाही व आपणास कोणता शासन निर्णय पाहिजे हेही स्पष्ट होत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

खुलासा **: "उपरोक्त संदर्भाकिंत विषयानुसार संगीता एस.मडावी ग्रामीण रुग्णालय परिसर चिचगड ता.देवरी जि.गोंदिया यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागणी केल्याप्रमाणे खुलासा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. (१) अपीलकर्ता संगीता मडावी यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत दिनांक ३.७.२००९ ला अर्ज केलेला असून अर्जात कोणत्या विषयासंबंधी व कशाची माहिती पाहिजे आहे याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नव्हता. त्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रमांक भंजिप/आवि/स्था-४/३४५९६/०९ दिनांक १८.७.२००९ अन्वये त्यांना**

**( पान २ वर .. )**

आपल्याला जी माहिती हवी असेल त्याबाबत स्पष्ट उल्लेख करावा व तसे पत्र या कार्यालयाला पाठवावे किंवा या कार्यालयात उपस्थित राहावे याबाबत अपीलकर्ता संगिता मडावी यांना कळविण्यात आले होते. परंतु संगीता मडावी हया उपस्थित झाल्या नाही किंवा त्यांनी पत्राद्वारे सुध्दा कळविले नाही. (२) पुन्हा संगीता मडावी यांनी दिनांक १४.७.२००९ ला पत्र दिले होते. त्याही पत्रात कोणत्या मुद्याची व कोणत्या विषयाची माहिती पाहिजे होती याचा स्पष्ट उल्लेख केलेला नव्हता. पुन्हा या कार्यालयाचे पत्र क्रं.भंजिप/आवि/आस्था-४/३६००/०९ दिनांक ४.८.२००९ अन्वये स्पष्टपणे कळविण्यात आले होते की, आपणास कोणती माहिती हवी आहे. याबाबत स्पष्ट उल्लेख करुन पत्राने कळवावे, परंतु अपीलकर्ता संगीता मडावी यांनी कोणतेही पत्र या कार्यालयास पाठविले नाही व स्वतः सुध्दा उपस्थित झाले नाही. त्यावरुन त्यांना कोणत्याही माहितीची गरज नव्हती असे स्पष्ट दिसून येते. उपरोक्त दोन्ही पत्र पोस्टाने पाठविले बाबतचे पोष्टाचे झेरॉक्स प्रत सोबत जोडलेले आहे. (३) जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत आरोग्य सेविका भरतीबाबत दिनांक १०.६.२००९ ला जाहिरात दिलेली होती. जाहिरातीच्या अटी व शर्तीनुसार परीक्षा घेऊन आरोग्य सेविकेची पदे भरावयाची होती. संगीता मडावी यांनी सुध्दा परिक्षेस बसण्याचे फार्म भरलेले होते. परंतु परीक्षा दिलेली नाही. संगीता मडावी यांनी दिनांक ३.७.२००९ ला मा.जिल्हाधिकारी भंडारा व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.भंडारा यांच्या नांवाने एक पत्र देऊन जाहिरातीद्वारे पद न भरता बंधपत्रीत उमेदवारांची निवड करुन शासकिय सेवेत सामावून घेण्यात यावे, या संबंधाने दिनांक ३.७.२००९ ला एक पत्र दिले होते. दिनांक ११.७.२००९ ला लेखी परीक्षा घेण्यात आली. परंतु त्या लेखी परीक्षेत बसलेल्या नाही. परीक्षा न घेता बंधपत्रीत उमेदवारांना सरळ सेवेत सामावून घेण्याबाबत त्यांनी मा. दिवाणी न्यायालय भंडारा येथे केस नंबर ९५/०९ दिनांक १९.७.०९ ला अपील दाखल केलेले आहे. सदर अपील संदर्भात न्यायालयात जि.प.भंडाराने उत्तर दाखल केले असून दिवाणी न्यायालयात केस सुरु आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

अपीलार्थी कु. संगीता मडावी यांना या कार्यालयाने दिनांक १८.७.०९ व दिनांक ४.८.०९ ला उपस्थित राहण्याबाबत लेखी पत्र देऊन सुध्दा त्या उपस्थित झाल्या नाही. त्यांना माहितीच्या अधिकारा अंतर्गत कोणती माहिती हवी आहे. याबाबत स्पष्ट उल्लेख न करता अर्ज दिलेला होता. त्यामुळे अपीलार्थीची अपील फेटाळण्यात यावी व माहितीच्या अधिकार अधिनियम २० अन्वये शास्ती लादण्यात येऊ नये ही विनंती."

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी, भरती प्रक्रियेमध्ये जो बदल करण्यात आला आहे त्यासंदर्भातील आदेश व निर्णयाची माहिती मागितलेली दिसून येते. तशा प्रकारचा बदल झालेला असल्यास त्याबद्यलची प्रक्रिया व माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

(पान ३ वर.. )

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक ३.७.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य/रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. माहिती उपलब्ध करुन न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -

तक्रार क्रमांक १४१/२००९

१) श्री सुधाकर जयराम बदकी,
फ्लॅाट नं.११/भारतीय गृह समस्या निवारण संस्था,
सोमलवाडा, रेल्वे क्रासींग, सोमलवाडा, नागपूर-१५. तक्रारकर्ता

वि रु ध्द

२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मारेगांव रोड, पांढरकवडा(मारेगांव),
जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक २९९/०९ मधील दिनांक ५.८.२००९ च्या आदेशाप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले असताना खर्चाचा भरणा भरुन घेत नाही व माहिती सुध्दा देत नाही या कारणास्तव दिनांक ३०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. तक्रारीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडून उत्तरवादी यांचा खुलासा मागविण्यात आला होता. परंतु खुलासा सादर केला नाही. परंतु आज दुपारी ४.०० वाजता ते प्रत्यक्ष हजर झाल्यावर त्यांनी तक्रारदार यांना पाठविलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती आयोगास सादर केल्या. तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदार यांना कळविलेल्या अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्यास ते तयार नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, तक्रारदार यांनी मोठया प्रमाणात कागदपत्रे मागितली आहेत व त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन ठेवल्या आहेत. त्यामुळे त्या सर्व प्रतीचा खर्च त्यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता भरणे आवश्यक आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे अर्जदारानी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती**

**( पान २ वर ..)**

**उपलब्ध करुन देण्यात यावी. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)        तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२)        तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -

तक्रार क्रमांक २४८/२००९

१) श्री सतिश रामराव दळवे,
शेंडे नगर, कामठी रोड, पोस्ट उप्पलवाडी,
जिल्हा नागपूर. तक्रारकर्ता

वि रु ध्द

२) जन माहिती अधिकारी
अन्न धान्य वितरण अधिकारी, नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक १६७६/२००७ च्या दिनांक २३.६.२००८ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. गैरतक्रारदार यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगास सांगितले. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना शैक्षणिक कार्यक्रम नियमावलीतील उद्योग या विभागाबद्यल सर्व नोंद उपलब्ध करुन दिली. परंतु अन्न व औषध प्रशासन या विभागाबद्यल नोंद उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर गैर तक्रारदार यांनी त्या नियमावलीची छायांकित प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -

तक्रार क्रमांक २२३/२००९

१) श्री रामदास जैराम मेश्राम,
इंदोरा झोपडपटटी, मायानगर,
ठवरेनगर कॅालोनीजवळ, पो.जरिपटका,
नागपूर-४४००१४ तक्रारकर्ता

वि रु ध्द

२) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, सिव्हील लाईन, नागपूर उत्तरवादी

(आदेश पारित दिनांक २४.१२.२००९)

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ८४८/०८ व अपील क्रमांक ८४९/०८ च्या दिनांक १२.६.२००९ च्या निर्णयाप्रमाणे एक महिन्याच्या आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यामुळे दिनांक २०.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक २४.१२.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. तक्रारकर्ता यांनी आयोगापुढे, गैर तक्रारदार यांनी पाठविलेली माहिती ही सिलबंद असल्यामुळे ती तपासून मागितलेल्या माहितीप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासून आयोगाचे निदर्शनास आणतो असे सांगितले. परंतु तक्रारदार व गैरतक्रारदार यांनी माहिती तपासली किंवा नाही हे आयोगाचे निदर्शनास दोघांनीही आणले नाही व दुपारी ४.३० वाजेपर्यंत आयोगाकडे पुन्हा आले नाही. व यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झाली व समाधान झाले आहे असा निष्कर्ष काढून तक्रार खारीज करण्यास पात्र आहे**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२) तक्रारकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर
दिनांक २४.१२.२००९

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1030/2009**

श्री विष्णु राजाराम वैरागडे
08 न.प.शॉ.कॉम्प्लेक्स देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयात दि. 10.9.2009 रोजी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.11.2009 रोजी देण्यात आलेला असून पुन्हा एक संधी देवून सुध्दा हजर न झाल्याने अपीलार्थीस अपीलाची आवश्यकता राहीली नाही. असे गृहीत धरुन अपील रद्द करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी दि. 5.9.91 चा बोगस वैद्यकीय व्यावसायीक शोधून काढण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर समिती रचना व कार्यपध्दतीचा शासन निर्णय आयोगाचे निदर्शनास आणले व त्या निर्णयाप्रमाणे समिती यांनी तपासणी करुन पोलीसांकडे कार्यवाहीसाठी पाठवावी अशी कार्यपध्दती दिली आहे असे सांगितले. तक्रारकर्त्याच्या तक्रारीवर पोलीस हे कार्यवाही करु शकत नाही व त्यामुळेच अधिकारी

यांचा अर्ज आला असला तरी त्याबाबतचा अहवाल हा संबंधित कार्यालयाकडून मागविण्यात आला होता. समितीकडून निष्कर्ष काढून मगच कार्यवाही पोलीसकडून करता येईल अशी कार्यपध्दती असल्यामुळे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1032/2009

श्रीमती कृष्णा प्रेमचंद कोहळी
बी–5 क्वेटा कॉलनी
नागपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
2) श्री आर. टी. पाटील
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय (ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयामध्ये आराजी दुरुस्तीच्या आदेशाप्रमाणे पटवारी रेकॉर्डमध्ये दुरुस्तीची नोंद घेणे. पटवारी रेकॉर्डमध्ये दुरुस्ती झाली आहे किंवा नाही त्याची सद्याची परिस्थिती विषयी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.6.2009 रोजी अपीलकर्ता यांना मौजा कापसी (खुर्द) प.ह.नं. 35 ता. नागपूर (ग्रामीण) येथील प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी आदेश पारीत केलेले असले तरी मौजा कापसी (खुर्द) येथील संपूर्ण अभिलेख प्रशासकीय कारणास्तव पुणे येथे पाठविण्यात आला असल्याने तूर्त सध्या तो या कार्यालयात उपलब्ध नाही. सबब या अभिलेखाअभावी मा. उपविभागीय अधिकारी यांचे आदेशप्रमाणे दुरुस्ती करणेस अडचण येत असल्याने आपणास त्याबाबत यापूर्वीच सूचित करण्यात आलेले आहे. तरी या गावाचा अभिलेख कार्यालयात उपलब्ध होताच आपल्या प्रकरणातील आदेशाचा त्वरित अंमल घेतला जाईल असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.7. 2009 रोजी देण्यात आलेला

असून आपील मान्य करण्यात येत आहे. दि. 16.7.2002 चे मा. उपविभागीय अधिकारी यांचे आदेशप्रमाणे कमीजास्त पत्रक तया करुन तहसिलदार नागपूर (ग्रामीण) यांचेकडे पाठवून तलाठी/पटवारी रेकॉर्ड दुरुस्ती करुन घ्यावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्या निर्णयाप्रमाणे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अर्ज केला त्यावेळेस जी वस्तुस्थिती होती ती कळविलेली आहे. अर्जदारास कार्यवाहीची अपेक्षा आहे व त्याबाबतही तपशिलवार कळविलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 15.9.2009 रोजी झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना कळविलेली आहे. व त्याबाबत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1031/2009**

श्री भोजराज बालाजी श्रीपाद पा.उप.नि.
पेलीस कॅम्प वणी (पहाड)
पो. नाकेवाडा ता. जिवती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक
पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य
जुने सचिवालय शही भगत सिंग मार्ग
कुलाबा रोड मुंबई
2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य
जुने सचिवालय शही भगत सिंग मार्ग
कुलाबा रोड मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयामध्ये सहा. पोलीस निरीक्षक पदोन्नतीचे संबंधाने यादीतील मुद्दे क्र. 1 ते 7 ची माहिती मागितलेली दिसून येते. त्यात प्रामुख्याने पदोननती का देण्यात आली नाही असे त्यांनी विचारले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. व त्या संदर्भामध्ये कार्यासन अधिकारी पोलीस महासंचालक यांनी 1200 पोलीस उप निरीक्षकांचे गोपनिय अहवाल पाहणे, त्याची प्रतवारी करणे आणि निवडसुची बनविणे इत्यादी मोठया प्रमाणावर कामाचा ताण असल्याने आणि त्याच कालावधीत हा अर्ज आलेला असल्यामुळे माहिती तात्काळ पुरविणे

शक्य झाले नाही. व त्यांच्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय देता आला नाही परंतु त्यांना आता माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. पोलीस महासंचालक यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अर्ज आल्यावर 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कार्यालयीन कामकाज आणि माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हया दोन बाबी वेगवेगळया आहेत आणि केंद्रीय अधिनियमाच्या तरतुदी हया बंधनकारक आहेत व त्याची पूर्तता केली नसल्यास त्याची शास्ती होते याची जाणीव जन माहिती अधिकारी यांना करुन देणे आवश्यक आहे. यापुढे अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची सबब ही योग्य नाही याची नोंद पोलीस महासंचालक कार्यालयाने घेणे आवश्यक आहे. अर्जदारानी मागितलेल्या मुद्याची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे देता येणार नाही. यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1029/2009

श्री शरदचंद्र प्रमदास वासनिक
मौजा आंबेडकर वार्ड वरठी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
भंडारा ता. जि. भंडारा
2) श्री एन. एस. जगनीक
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
मोहाडी ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.5.2009 रोजी शासकीय माहिती अधिकारी तहसिलदार यांचेकडे सनफ्लॅग कर्मचारी पत संस्था माति तेलाची लायसंन्स व यांच्याकडे असलेले 297 ए.पि.एल. कार्ड धारक या पैकी कार्ड धारकाचे कार्ड कोणत्या पुराव्याच्या आधारे तयार करण्यात आले आहे अशी माहिती विचारलेली आहे. त्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 30.6.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.7.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना तत्पूर्वी दि. 17.7.2009 रोजी माहिती देण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलानंतर दि. 17.9.2009 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता उपलब्ध करुन दिलेली माहिती ही योग्य आहे. परंतु अधिनियमात दिलेल्या मुदतीचे पालन केलेले नाही त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की सदरची माहिती 1990 ची जुनी असल्यामुळे त्या कागदपत्राचा शोध घेण्यास विलंब झाला परंतु ती आढळुन आलेली नाही त्यामुळे शास्ती करण्यात येवू नये अशी त्यांनी विनंती केली. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.12.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1036/2009**

श्री नितीन जी. ताटिया
345 श्रध्दा हाऊस पहिला माळा
किंग्जवे नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त –1 महानगर पालिका नागपूर

2) श्री एस. बी. जयस्वाल
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विद्युत)
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता पथदिवे विभागाकडे एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.1.2009 रोजी रु. 140/– चा भरणा करुन माहिती घेवून जावी उर्वरीत माहिी शक्य झाल्यास 15 दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 29.1.2009 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. दि. 2.4.2009 रोजी ॲड. विणा नौकरकर यांनी दि. 1.1.2009 च्या पत्राच्या अनुषंगाने रकमेचा भरणा केलेला दिसून येतो. व त्यानंतर माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 24.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.10.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती नस्तीचा शोध घेवून उपलब्ध करुन देण्यात यावी व शोध लागत नसेल तर तसे कळवावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर दि. 26.10.2009 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. मिसेस चिलबुले हया हजर झालेल्या आहेत व त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती जी उपलब्ध झालेली आहे ती त्यांनी मागितलेल्या माहिती पेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व जी माहिती मागितलेली आहे त्याबाबतच्या नस्ती उपलब्ध नाहीत असे त्यांनी कळविले असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना एकुण आठ हजार पुष्ठे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यात ॲग्रीमेंट कॉपीज नाही असे अपीलकर्ता तर्फे सांगण्यात आले. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आवश्यक असेल ती सर्व माहिती पुन्हा त्यांनी अभिलेखाची तपासणी केल्यास उपलब्ध करुन देता येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून संबंधित अभिलेखाची तपासणी करुन आवश्यक असेल त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय आहे असे दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतील तारीख व वेळ कळवावी व त्या तारखेस व वेळेस उपस्थित झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या संपूर्ण माहितीच्या संदर्भातील नस्त्या निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्यातून अपीलकर्ता यांनी आवश्यक असेल त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन घ्येण्यात याव्या. तसे न केलयास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1052/2009**

श्री चिंतामण ना. नागपुरे सचिव
संत मिराबाई प्रशिक्षण केंद्र, शेर मंजील बिल्डींग,
पहिला माळा, सरकारी दवाखान्यासमोर
भारत कुलर्सच्या बाजुला मेन रोड चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई
22 बी कल्याणी केंद्र अशोक वन हनुमान टेकडी आराधना बिल्डींग समोर
बोरीवली (पुर्व) मुंबई 400066
2) जन माहिती अधिकारी तथा
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई
22 बी कल्याणी केंद्र अशोक वन हनुमान टेकडी आराधना बिल्डींग समोर
बोरीवली (पुर्व) मुंबई 400066 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी हजर नात्हते. व त्यांनी प्रशासक व्यवस्थापक नागपूर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे असे पत्र राज्य माहिती आयुक्त यांना दिलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (5) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली आहे किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांचे वर आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे वैयक्तीकरीत्या आयोगापुढे हजर राहणे आवश्यक आहे. प्रतिनिधी नियुक्त करण्याची तरतुद नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.5.2009 रोजी व्यवस्थापकीय संचालक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई यांचेकडे सन 2008–2009 या आर्थिक वर्षात थकीत प्रशिक्षण संस्थेचे देयके देण्याकरीता महाराष्ट्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला व कोणत्या संस्थेला वाटप करण्यात आला त्या संस्थांनी कोणत्या वर्षात प्रशिक्षण पुर्ण केले

याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना अधिनियमच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार सुध्दा केलेला नाही. परंतु दिनांक 4.7.2009 रोजी माहिती संकलीत झालेली असून रक्कम रु. 51/– चा भरणा करावा असे पत्र दिले व त्यानंतर पुन्हा दि. 20.7.2009 रोजी रक्कम रु. 51/– चा भरणा करावा याबद्यलचे स्मरणपत्र दिलेले आहे. वास्तविक 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास ती विनामुल्य देण्यात यावी अशी तरतुद असून सुध्दा 45 दिवसा नंतर अतिरिक्त शुल्क भरण्याकरीता पत्र दिलेले आहे. तरी सुध्दा माहिती मिळावी या कारणास्तव त्यांनी दि. 21.7. 2009 रोजी रु. 51/– चा भरणा केला. मात्र त्यानंतर त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर प्राधिकृत केलेले प्रशासक व्यवस्थापक यांनी दि. 29.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्राद्वारे माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु सदरचे पत्र कोणत्या कार्यालयाकडून पाठविण्यात आले आहे याबाबतचा कोणताही उल्लेख त्यावर नाही. पृष्ठ क्र. 1 ते 10 असे लेखी दिलेले असले तरी त्याबद्यलची काणत्याही प्रकारची माहिती तपशिलात दाखल केलेली नाही. याबाबत प्रतिनिधी यांना कोणत्याही प्रकारे खुलासा करता आलेला नाही. यावरुनच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व तशी आयोगाची खात्री झालेली आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम 20 प्रमाणे दोषी आढळुन येतात. विहित मुदतीत माहिती दिली नाही विहित मुदतीच्या नंतर अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्याचे पत्र दिले व त्यानंतर पुरेशी माहिती दिली नाही तसेच आयोगापुढे माहिती अधिकारी हजर झाले नाही या कारणास्तव त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक राहील. परंतु आज आयोगापुढे हजर नसल्यामुळे कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुन घेता येत नाही. त्यामुळे त्यांचा शास्ती बद्यलचा खुलासा मागविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण कागदपत्राच्या छायांकीत प्रती माहितीच्या अधिकारात दिली असे प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येईल.

2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचेविरुध्द रु. 25000/– शास्ती कायम होईल. व सदरची शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करुन संबंधित लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

3) अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2009 रोजी अतिरिक्त माहितीच्या करीता भरणा केलेली रक्कम रु. 51/– ही मुदतबाहय असल्यामुळे त्यांना त्वरीत परत करण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1054/2009**

श्री केशव अजाबराव वंजारी
मु. कोळंबी पो. खानगाव
ता. काटोल जि. नागपूर 441302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चंबर्स (अनेक्स) सिताबर्डी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
दि नागपूर जिल्हा सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक लि.
रुईकर रोड, गांधीसागर नागपूर 440018 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून दि नागपूर जिल्हा सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक लि. यांना सेवासंबंधी भरती प्रक्रियाबाबत लेखी परीक्षा मुलाखत बाबत पुर्ण विवरण बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.8.2009 रोजी प्रभारी व्यवस्थापक यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (ध) (त्र) नुसार देता येत नाही तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार माहिती देणे बॅकेला बंधनकारक नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 6.10.2009 रोजी देण्यात आलेला असून अर्जदार यांनी माहितीच्या अधिकारात बॅकेला माहिती मागितलेली असून मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र. 5566/2007 मध्ये दिलेल्या निर्णयानुसार माहितीचा अधिकार हा सहकारी बॅकांना लागू होत नाही

करीता अर्जदारानी मागविलेली माहिती माहितीच्या अधिकारात देणे बॅकेला बंधनकारक नाही. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की बॅक ज्या कामकाजासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 प्रमाणे शासकीय अधिकारी ज्या अर्थी प्रशासक नियुक्त केला जावू शकतो त्याअर्थी शासनाचे नियम सहकारी बॅकेवर असतांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी सहकारी बॅकांना लागू होत नाही असा प्रथम अपीलीय अधिकारी तसेच प्रभारी व्यवस्थापक यांचे मत योग्य नाही. त्यावर प्रभारी व्यवस्थापक दि नागपूर जिल्हा सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक लि. यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उत्तरवादी बॅक ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत कार्य करीत असुन मा. उच्च न्यायालयाने नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र. 5566/2007 मधील डॉ. पंजाबराव अर्बन को–ऑपरेटिव्ह बॅक लि. विरुध्द राज्य माहिती आयुक्त व इतर मध्ये दि. 13. 1.2009 रोजी आदेश पारीत करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा नागरीक सहकारी बॅकांना तसेच सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. तसेच मा. राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ नागपूर यांनी सुध्दा उपरोक्त मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाला अधिन राहून अपील क्र. 2646/2007 भास्कर मिठूजी डोंगरे विरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी तसेच प्रभारी व्यवस्थापक दि गोंदिया जिल्हा सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक लि. व इतर मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय देवून अपीलार्थीचे अपील दि. 10.2.2009 रोजी खारीज केलेले आहे. त्यामुळे अपील हे प्रथम दर्शनीच खारीज करण्यात यावे.

1. अपीलार्थी यांनी मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेंकडे दि. 23.7.2009 रोजी अपिल दाखल केली असून त्यानुसार दि नागपूर जिल्हा सेन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक लि. नागपूर यांना दि. 31.7.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज करुन माहिती मागितली असल्याचे अपिलार्थी यांनी नमुद केले आहे. बॅकेने अपीलार्थी यांना बॅकेचे कार्या. पत्र क्र. प्रशासन/माहितीचा अधिकार/2009–2010/1897 दि. 26.8.2009 अन्वये अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये बॅकेला देणे बंधनकारक नाही असे कळविण्यात आले आहे.

2. अपीलार्थी यांनी दि. 19.9.2009 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये अपीलीय अधिकारी म्हणून मा.श्री राजेश भुसारी साहेब विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे प्रथम अपील सादर केली. बॅकेने सदर अपीलमध्ये आपले उत्तर सादर करतांना अपिलार्थीला योग्यप्रकारे कळविल्याने अपिलार्थीची अपिल खारीज करण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे अपीलीय अधिकारी यांनी दि. 6.10.2009 रोजी आदेश

पारीत करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 बॅकेला लागू होत नसल्याने सदर कायद्यानुसार माहिती देणे बंधनकारक नाही असे नमूद करुन सदर अपिल फेटाळली. अपिलार्थीचे सदर आदेशाने समाधान न झाल्यामुळे येथे अपिल दाखल केले आहे.
3. उत्तरवादी बॅक ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत कार्यरत असुन विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर शासनाने माहिती अधिकारी नेमण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे बॅकेने मुख्य कार्यालय स्तरावर माहिती अधिका–याची नियुक्ती केली आहे.

4. मा. राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांनी केस क्र. 631/09 गोंविंदराव चौधरी विरुध्द बॅक मध्ये सुनावणीचे वेळी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 बॅकेला लागू आहे किंवा नाही याबाबत शासनाकडून निर्देश मागविण्याबाबत तोंडी सुचित केले होते. त्याप्रमाणे बॅकेने मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे पत्र क्र. प्रशासन/कोर्ट सेक्शन/2009–10/2262 दि. 30.9.2009 नुसार मार्गदर्शन मागीतले असता त्यांचेकडून फॅक्सद्वारे पत्र क्र. अर्थ/वसा/नागपूर जिमसबॅक/माअ/नियुक्ती/मार्गर्दान/09 दि. 11.12.2009 नुसार सदर बाबतीत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर व औरंगाबाद यांनी अनुक्रमे याचिका क्र. 5566/2007 आणि 1304/2008 मध्ये आदेश दिलेले आहेत. तसेच राज्य माहिती आयुक्त यांनी अपील क्र. 2646/2007 मध्ये आदेश दिलेले आहेत. सोबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेले आदेश दि. 17.2.2009 ची प्रत जोडली आहे. वरील आदेशात नमुद असल्याप्रमाणे आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे मार्गदर्शन केले.

वरीलप्रमाणे मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर व औरंगाबाद तसेच राज्य माहिती आयुक्त यांचे आदेशाला अनुसरुन सहकारी बॅकांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू होत नसल्याचे स्पष्ट होते.

उत्तरवादी बॅकेचे वरीलप्रमाणे म्हणणे विचारात घेवून अपिलार्थीची अपील कृपया खारीज करावी. यावरुन सहकारी बॅकांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू होत नाही मा. उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने निर्णय दिलेला असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य दिसून येतो व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.12.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1059/2009

श्री संजय गोलावार
राम नगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर
वैनगंगा नगर अजनी नागपूर
2) श्री डी. एन. शेळके
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग नागपूर
वैनगंगा नगर अजनी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. असंपादित जागेत गौळ ल.का.चे काम करण्यात आले होते नंतर ते काम संपादीत जागेत केले. हा खर्च कोणाकडुन वसुल केला? रक्कम किती.?
2. सा.क्र. 0 ते 600 चे सिमा गोटे केव्हा गाडणार? पुढील काम केले काय
3. सा.क्र. 710 वर पुल बांधला त्याचा उद्येश काय? तसेच सा.क्र. 0 ते 210 मध्ये शासकीय जागेत सर्व्हीस रोड केव्हा करणार
4. मुळ संरेखेप्रमाणे मायनरचे काम न करण्याचे कारण काय?
5. सुधारीत संरेखेस कोणाची मंजूरी आहे?
6. सुधारीत कायनरचे जागेकरीता संबंधीत शेतक–यांना विचारणा केली काय?
7. माझे शेतातील जे शासनाचे अतिक्रमण केव्हा काढणार? त्यामुळे मला शेत वहीवाटीस अडचण होत आहे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि.17.6.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या

माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.6.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.7.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. पुन्हा दि. 29.7.2009 रोजी अपीलकर्ता यांना दि. 17.6. 2009 च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 20.11.2009 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. 3.अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.8.2009 रोजी सात मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितलेली होती. परंतु अपीलात त्याबाबतचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 7.8.2009 च्या कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग अजनी नागपूर यांचेकडे प्रथम अपीलाच्या संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात छायांकीत प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्या दि. 7.8.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांना दिलेल्या प्रतिलिपीच्या संदर्भात सुनावणी घेवून छायांकीत प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केले असे होईल याची नोंद घेण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.12.2009**

( विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1058/2009

श्री प्रविण माणिकराव भुसारी
जुना बाभुळखेडा साठवणेच्या घरी
पो. भगवान नगर नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर मेडीकल नागपूर
2) श्री आडोरवार
जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर मेडीकल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचेकडे आपल्या महाविद्यालयात चतुर्थ श्रेणी कर्मचा–यांची नियुक्ती करण्याबाबतची पध्दत व त्यासंबंधीत असलेल्या सर्व नियमांची शासकीय धोरणांची सामान्य प्रशासन विभाग यांचे आदेशाची परिपत्रकांची सुचना अधिसूचना इ. यांची प्रत्येक एक प्रत देण्यात यावी अशा प्रकारे एकुण 17 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.6.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.8. 2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना
संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी ही बाब आयोगाचे सुनावणीच्या वेळेस निदर्शनास आणलेली होती. कागदपत्राचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1055/2009

श्री विलास देविदास खोंड
प्लॉट नं. 46 महात्मा गांधी नगर
म्हळगी नगर रिंग रोड चौक
नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. केळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर प्रविभाग नागपूर
प्रकाश भवन लिंक रोड सदर नागपूर 440001
2) श्री डी. एम. मानकर
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर प्रविभाग नागपूर
प्रकाश भवन लिंक रोड सदर नागपूर 440001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी अधिक्षक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. शहर प्रविभाग नागपूर यांचेकडे दि. 10.1.06 रोजी बदल्या करण्यात आल्या त्या पुर्वि सर्व संघटनांची बैठक कधी कोणत्या तारखेला घेण्यात आली त्या संदर्भात एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.10.2008 रोजी अतिरिक्त माहिती करीता रु. 96 चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि.20.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.8.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिका–यानी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 20.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यानंतर दि. 15.12.2009 रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

अपीलकर्ता यांनी सुनावणीच्या वेळेस युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 4, 5 ची माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. परंतु अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 4 ची माहिती सुध्दा देण्यात आलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. 28.3.2006 रोजी झालेल्या बैठकीच्या निर्णयाप्रमाणे झालेल्या टिपणीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच मुद्या क्र. 5 ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे दि. 17.12.2009 रोजी दाखल केलेल्या माहितीच्या संदर्भात तपासणी करुन अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्र. 5 तसेच त्यांना दि. 17.12.2009 रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे दिलेल्या पत्राच्या संदर्भामध्ये तपासणी करुन, व हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1076/2009**

डॉ. किशोर रावजी नैताम
मु. पो. आलापल्ली
ता. अहेरी जि. गडचिरोली 442703 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ
2) श्री डी. एन. देडे
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
जिल्हा आरोग्य विभाग
जिल्हा परिषद यवतमाळ
ता. जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.12.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य विभाग यांचे कार्यालयात माहे 2005 ते माहे 25 जुलै 2007 या कालावधीतील त्यांचे वेतन मिळाले नसल्यामुळे माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता हे गैरहजर राहिल्यामुळे अपीलाचा निर्णय दिलेला नाही असा खुलासा केलेला आहे. वास्तविक अपीलकर्ता हे हजर असले किंवा गैरहजर असले तरी माहिती दिली किंवा नाही हि सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. व त्यांचेकडूनच माहिती घेवून निर्णय देणे आवश्यक असते. अपीलकर्ता गैरहजर आहे म्हणजे अपील रद्द करणे किंवा निर्णय न देणे हे योग्य नाही. आयोगाचे कार्यालयातून नोटिस काढल्यानंतर मात्र दि. 19.12.2009 रोजी अपीलकर्ता यांचे रु. 50382/– चे वेतन देयक तयार करुन कोषागार कार्यालय यवतमाळ येथे सादर करण्यात

आलेले आहे. आदेश पारीत होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व तसा खुलासा आयोगाकडे सुध्दा करण्यात आलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे सिध्द होते व त्यामुळे ते दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद यवतमाळ यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ** यांनी करावयाची आहे

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1074/2009

श्री राजू उकंडराव थुल
मु. समता नगर दयाल नगरचे मागे वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. डी. खंडाते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी
सदर नागपूर

2) श्री एस. एम. कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय समाज कल्याण कार्यालय
सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.8.2009 रोजी प्राथमिक शिक्षक (जि.प.वर्धा) यांनी मार्च 2009 पासून सादर केलेले प्रस्ताव त्यापैकी किती शिक्षकांची जाती पडताळणी झाली? किती शिक्षकांची व्हायची आहे त्यांची कारणे यादीसह मार्च 2009 पासून मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.8.2009 रोजी विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 नागपूर विभाग नागपूर या कार्यालयात शिक्षकांची जिल्हावार स्वतंत्र यादी ठेवण्यात येत नाही. कालक्रमानुसार प्राप्त होणारे अर्ज नोंदविण्यात येतात. त्यानुसार प्रस्तावांची तपासणी केली जाते. माहितीच्या अधिकारा अंतर्गत उपलब्ध असलेल्या मुळ कागदपत्राच्या प्रती पुरविणे अपेक्षित आहे. परंतु माहिती तयार करुन देणे अपेक्षीत नाही. सबब कलम 2 (च) नुसार माहिती नाकारण्यात येत आहे असे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. 2614/09 दि. 6.8.2009 अन्वये विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 नागपूर विभाग नागपूर या कार्यालयात शिक्षकांची जिल्हावार स्वतंत्र यादी ठेवण्यात येत नाही. कालक्रमानुसार प्राप्त होणारे अर्ज नोंदविण्यात येतात. त्यानुसार प्रस्तावांची तपासणी केली जाते. माहितीच्या अधिकारा अंतर्गत उपलब्ध असलेल्या मुळ कागदपत्राच्या प्रती पुरविणे अपेक्षित आहे. परंतु माहिती तयार करुन देणे अपेक्षीत नाही. सबब कलम 2 (च) नुसार माहिती नाकारण्यात येत आहे असे दिसून येते. तसेच प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराचे या अधिनियमा चे कलम 7 (1) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. 1 नागपूर विभाग नागपूर यांचेकडे 30 दिवसाचे आंत अपील करता येईल असे टपाल दाखला घेवून अर्जदारास कळविले.

अर्जदाराचे वरील माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी दि. 26.8.09 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि.14.9.09 रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येवून अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिला.

भारत सरकार यांचे माहितीचे अधिनियम 2005 मधील कार्यालय निवेदन पत्रिका दि. 10.7.05 प्रमाणे परीच्छेद क्र.2 नुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात माहिती ज्या स्वरुपात आहे त्याच स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. मागितलेल्या माहितीमध्ये संशोधन करणे वा दुरुस्ती करुन माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही अशा सुस्पष्ट सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना या कार्यालयात शिक्षकांची जिल्हावार स्वतंत्र यादी ठेवण्यात येत नाही. कालक्रमानुसार प्राप्त होणारे अर्ज नोंदविण्यात येतात. त्यानुसार प्रस्तावांची तपासणी केली जाते. माहितीच्या अधिकारा अंतर्गत उपलब्ध असलेल्या मुळ कागदपत्राच्या प्रती पुरविणे अपेक्षित आहे. परंतु माहिती तयार करुन देणे अपेक्षीत नाही. सबब कलम 2 (च) नुसार माहिती नाकारलेली आहे.

अपीलार्थी श्री राजू उकंडराव थुल हे कास्ट्राईब शिक्षक संघटना वर्धा यांचे अध्यक्ष म्हणून समिती कार्यालयामध्ये वारंवार येवून त्रयस्थ शिक्षकाच्या प्रकरणाची माहिती विचारुन जातवैधता प्रमाणपत्र का झाले नाही अशी विचारणा करतात व त्यांच्या जवळच्या शिक्षकाचे जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याकरीता समितीला प्रभावित करण्याचा सातत्याने प्रयत्न करतात.

वरील परिस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी म्हणून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व वस्तूस्थितीदर्शक खुलासा मान्य करुन अपील खारीज करण्यात यावे अशी नम्र प्रार्थना आहे.

सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयामध्ये वर्षवार किंवा जातीनिहाय स्वतंत्रपणे माहिती जतन केली जात नाही. व त्यामुळे सदरची माहिती ही संकलीत करुन तयार करुन देणे शिवाय पर्याय नाही. परंतु अशा प्रकारे माहिती ही संकलीत करुन उपलब्ध करुन देण्याची तरतुद नाही. तसेच ती संकलीत करावयाचे असल्यास जन माहिती अधिकारी यांना स्वतंत्रपणे त्यांच्या कार्यालयाची यंत्रणा त्या कामास वळवावी लागेल व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे माहिती उपलब्ध आहे व ती रजिस्टर वरुन त्यांनी काढून द्यावी परंतु जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वरील युक्तीवादाप्रमाणे ते व्यवहार्य आहे असे दिसून येत नाही. त्यापेक्षा अपीलकर्ता यांनी जि.प.मधून किंती शिक्षकांची नियुक्ती अधिका–याने जात पडताळणीसाठी पाठविली व त्यातील किती प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे प्राप्त झाली ही माहिती त्यांना उपलब्ध होवू शकेल. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1078/2009**

श्री दादाराव पतिरामजी मुलवंडे
59 शिवाजी कॉलनी (संकृती सोसायटी) नासरे कार्यालय मागे
शिवमंदीर जवळ हुडकेश्वर रोड
नागपूर 34 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषी)
पंचायत समिती कार्यालय नागपूर ग्रामीण
नागपूर
2) श्री जी. बी. खरपूरिया
जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी
गट ग्रामपंचायत नरसाळा
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत हुडकेश्वर नरसाळा यांचेकडे त्यांच्या घराला लागुन असलेला वेल्डींग, इंजिनिअरींग इलेक्ट्रीक कारखान्याच्या माहिती अनुषंगाने दि. 31.1.2006 ते दि. 5.8.2009 या कालावधीतील श्री चुडामण देशमुख यांच्या कारखान्याच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया प्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दि. 3.11.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दि. 6.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की ग्राम विकास अधिकारी यांनी त्यांना दि. 1.10.2009 रोजी सर्व मुद्यांची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची विचारल्यामुळे माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. वास्तविक त्यांनी दिलेल्या निवेदनावर काय कार्यवाही केली अशी माहिती त्यांनी विचारली आहे व कार्यवाही केली असल्यास त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व कार्यवाही केली नसल्यास कळविणे आवश्यक होते. यावरुन सदरची माहिती नाकारण्याचा प्रकार आहे असे त्यांनी युक्तीवादात सांगितले. त्यांच्या निवेदनावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व जे प्रश्न विचारलेले आहे त्यातून जर कागदपत्रे उपलब्ध करता येत असतील तर त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती देणे अपेक्षित आहे. प्रश्नाचे स्वरुप पाहुनच उत्तर देणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. व त्यामुळे दि. 6.11.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जी माहिती दिलेली आहे

ती त्यांना 30 दिवसाचे आत सुध्दा देता आली असती. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की आतापर्यंत त्यांनी भरपूर तक्रारी केलेल्या आहेत. खंड विकास अधिकारी यांचेकडे पण तक्रारी केलेल्या आहेत. परंतु कोणत्याही प्रकारे कार्यवाही झालेली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा आधार घेण्यात आलेला आहे. यापुढे सचिव ग्रामपंचायत यांनी अशा प्रकारे उत्तर देण्याचे टाळावे व जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असेल ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी मुळ तक्रारीच्या संदर्भामध्ये ग्रामपंचायत कडून न्याय मिळत नसेल तर खंड विकास अधिकारी यांचेकडे ग्रामपंचायत अधिनियमाप्रमाणे तक्रार करणे आवश्यक आहे. व तशी तक्रार केली असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे त्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली असे विचारणे आवश्यक आहे. परंतु सदरच्या प्रकरणात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1071/2009, 1072/2009.**

श्री गोविन्द सदाशिव मेश्राम
शक्तीमातानगर प्लॉट नं. 29 खरबीरोड
नगपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण)
महानगर पालिका नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपील क्र. 1071/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग म.न.पा. नागपूर यांचेकडे मुख्याध्यापका मार्फत पाठविलेल्या प्रस्तावावर दि.2.6.2008 जा.क्र.36 अनुसार कार्यवाही का करण्यात येत नाही. याची माहिती देण्यात यावी. जर कार्यवाही केली नाही तर तो सामान्य नियमानुसार परत पाठविला जातो. प्रस्ताव परत का पाठविला नाही याची माहिती देण्यात यावी. काही खास लोकांच्या प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही होते व ते वरीष्ठ अधिका–यासमोर ठेवले जातात. म्हणजे यामध्ये भ्रष्टाचार करण्यात येते हे सत्य आहे काय? याबद्यल माहिती देण्यात यावी. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.7.2009 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आज जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे दोघेही हजर नाहीत. व त्यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. त्यांच्या तर्फे श्री रामटेके क. लि. प्रतिनिधी म्हणून हजर झाले. परंतु ते काहीही सांगू शकले नाही. तसेच शिक्षणाधिकारी तथा माहिती अधिकारी महानगर पालिका नागपूर व प्रथम अपीलीय अधिकारी महानगर पालिका नागपूर यांनी खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाशामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही

झालेली आहे असे नमूद केलेले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली नाही व त्याकरीता जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नाही व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही आयुक्त महानगर पालिका यांनी करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 1072/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 8.6.2009 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग म.न.पा. नागपूर यांचेकडे कु./श्रीमती मंगनानी, श्री गावंडे, कु./श्रीमती एम.एम.शर्मा, कु. कमल कैथवास यांना पदवीधर वेतनश्रेणी देतांना लिहिलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत देण्यात यावी. 93 ते 2000 या काळात 05 अमान्यता प्राप्त शाळेत नियुक्त शिक्षक, शिक्षिका व मुख्याध्यापकांचे नाव व शाळा यांच्याबद्यलची माहिती देणे. वरील 05 अमान्यता प्राप्त शाळेत नियुक्त व पदोन्नती देतांना लिहिलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत व प्रस्ताव लिहिणा–या अधिका–याचे नाव व पद माध्यमिक शाळेत नियुक्ती व पदोन्नती देतांना मनपा वित्त विभाग शाळेवर वरील खर्च जि.प. कडून वसूल करण्यावर भर देतो. वरील खर्च जि.प. कडून घेण्यात आला काय नाही तर संबंधित अधिका–याचे नाव व पद व यावर केलेल्या खर्चाची रकमाची सखोल माहिती देणे. सन 93 पासून 2000 पर्यंत पे प्रोटेक्शन झालेल्या शिक्षकांची माहिती खालील प्रारुपात देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती सुचना दिल्यावर स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 11.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. शिक्षणाधिकारी तथा माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाशामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही व त्यामुळे खुलाशातील मुद्दे हे निरंक दाखविले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून ते दोषी आहेत. व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील हे 30 दिवसामध्ये सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक असते. परंतु ती प्रक्रिया केलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही आयुक्त महानगर पालिका यांनी करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 1071/2009 व अपील क्र. 1072/2009 हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 29.5.2009 व दि. 8.6.2009 या दोन अर्जाच्या अनुषंगाने विनामुल्य माहिती रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपील क्र. 1071/2009 व अपील क्र. 1072/2009 अपीलकर्ता यांच्या दि. 29. 5.2009 व दि. 8.6.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती कायम होईल व त्यांचे दरमहाचे वेतनातून शास्तीची रक्कम वसूल करुन लेखाशिर्षामध्ये जमा करणे आवश्यक राहिल.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त महानगर पालिका नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.12.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1107/2009**

श्री गोविन्द सदाशिव मेश्राम
शक्तिमाता नगर, प्लॉट नं. 29 खरबी रोड
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
नगर भूमापन अधिकारी क्र. 2
जूना सचिवालय नागपूर
2) श्री जे. एम. बेंडे
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्र. 2
जूना सचिवालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.6.2009 रोजी माहिती अधिकारी नगर भूमापन अधिकारी क्र. 2 यांचेकडे त्यांनी दिनांक 17.10.2006 ला कार्यालयात नामांतर करण्याबाबत व मालमत्ता पत्रकावर नाव चढविण्याकरीता अर्ज दि. 17.10.2006 ला मागणी केल्याने एन ए आदेशाची प्रत पुर्वीच्या मालकाच्या रजिस्ट्रीची प्रत व उपलब्ध असलेल्या 7/12 ची प्रत दि.5.11.07 ला कार्यालयात सादर करण्यात आलेली आहे. पण आतापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2009 रोजी प्रथम अपील प्रथम दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 21.8.2009 रोजी अर्जात गावाचे नाव (मौजा) नमूद केले नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्याबाबतची पुर्ती न करता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहितीचा दि.12.6.09 चा अर्ज प्राप्त झालेला नाही. परंतु सदरचा अर्ज हा रजिस्ट्री क्र. आरएलए 8556 दिनांक

12.6.09 असा पाठविलेला आहे व सोबत दि. 17.10.2006 च्या पत्राची छायांकीत प्रत पाठविलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की दि. 17. 10.2006 च्या प्रत्र दिल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांच्या दि. 17.10.2006 च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1105/2009

कु. चेतना हिरामण सोनवाने
तिवारी कॉलनी गुरुनानक वार्ड गणेश नगर
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

2) श्री एस. आर. शिंदे
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.12.200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.6.2009 रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांचेकडे दि. 24.5.09 ला पद स्वयंपाकी गट ड पदाची लेखी परीक्षा बैठक क्र. 3684 च्या निकालाची उत्तर पत्रिका तसेच प्रश्न पत्रिकेची मुळ उत्तर पत्रिका नक्कल मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने परिक्षे संबंधात कोणतीही माहीती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील नियम क्र. 8 (1) (इ) च्या तरतुदीनुसार देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.10. 2009 रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत कलम 8 (1) (इ) व 8 (1) (आय) नुसार देता येणार नाही असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले होते. मात्र त्यांची स्वतःची उत्तर पत्रिका प्रत्यक्ष या कार्यालयास उपस्थित झाल्यानंतर फक्त त्यांना पाहता येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की उत्तर पत्रिकेची प्रत ही उपलब्ध करुन देता येणार नाही व त्यामुळे कलम 8 (1) (इ) चा अपवाद केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असा युक्तीवाद करुन स्वतःची उत्तर पत्रिका प्रत्यक्ष कार्यालयास उपस्थित झाल्यानंतर पाहता येईल असा निर्णय त्यांनी दिला होता. परंतु त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता हया उपस्थित झाल्या नाही. व त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केली. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी स्वतःची उत्तर पत्रिका प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून निरीक्षण करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस तारीख व वेळ ही कळवून त्या तारखेस व वेळेस उपस्थित राहून त्यांचेकडे असलेल्या उत्तर पत्रिकाचे निरीक्षण करावे. उत्तर पत्रिका निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देतांना कार्यालयीन कर्मचारी यांचे उपस्थितीत निरीक्षण उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1108/2009

श्रीमती शकुंतला मारोती आटे
अंबाझरी टेकडी डॉ. चौक
पो. शंकरनगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग सदर क्र. 1
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग आमदार निवास
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांचेकडे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर निवृत्त वेतन व इतर लाभ प्राप्त न झाल्याबाबत दि. 18.6.2009 व 31.8.2009 दिलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची तसेच परिपत्रकाची सत्यप्रत व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.9.2009 रोजी माहितीचा अधिकार हे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सदर क्र. 1 नागपूर असल्याने त्यांनी माहितीचा अधिकार नियमांतर्गत आवश्यक असलेली माहितीसाठी माहिती अधिका–याच्या नावानेच व त्यांच्या कार्यालयातच अर्ज सादर करावा. अर्ज सादर करतांना अर्ज हा विहीत नमुन्यात असावा व त्यावर रु.10/– ची कोर्ट फी स्टॅम्प असणे आवश्यक आहे. त्यांनी अर्जावर पोष्टाची रु.10/– ची तिकीट लावली आहे जे नियमबाहय आहे. करीता त्यांचा मुळ अर्ज परत करण्यात येत आहे असे कळविले वर सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी प्रथम अपील प्रथम दाखल केले. व प्रथम दाखलात कळविल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची दुरुस्ती न करता दिलेली माहिती चुकीची आहे असे कारण दिलेले दिसून येते. त्यामुळे दि. 6.10.2009 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अंतर्गतचा रु.10/– चा पोष्टेज स्टॅम्प लावून उपअभियंता तथा जन माहिती अधिकारी आमदार निवास यांना अर्ज सादर केलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग सदर क्र. 1 नागपूर हे असुन उपअभियंता हे

सहाय्यक माहिती अधिकारी आहेत. तसेच पोष्टेज स्टॅम्प न लावता कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता हे अपीलीय अधिकारी नसल्याने आपल्या अर्जावर कार्यवाही करणे अपेक्षित नाही असे कळविलेले दिसून येते. असे कळविल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे माहितीचा अर्ज योग्य त्या नमुन्यात दाखल न करता व कोर्ट फी स्टॅम्प न लावता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. मात्र आयोगाकडे जो अर्ज दाखल केला आहे त्या अर्जावर रु.10/- ची कोर्ट फी स्टॅम्प लावलेली झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. यावरुन अपीलकर्ता हे प्रमाणिक आहे असे दिसून येत नाही. कार्यालयाने जोडपत्र अ दाखल केलेले आहे त्यावर उपविभागीय अभियंता अशी खेडतोड केलेली आहे. यावरुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न अपीलकर्ता यांनी केलेला आहे. अपीलकर्ता यांना दि. 16.9.2009 रोजी कळविल्यानंतर सुध्दा तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा कळविल्या नंतर सुध्दा आयोगाकडे युक्तीवाद करतांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवर आरोप केलेले आहे. मात्र कळविल्या प्रमाणे अर्जावर कोणत्याही प्रकारची दुरुस्ती केलेली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन देणे हे प्रमुख उद्येश असल्यामुळे तांत्रिक बाबीवर अपील खारीज न करता त्यांच्या दि. 18.6.2009 व 31.8.2009 च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 18.6.2009 व 31.8.2009 च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीच्या माहितीची कागदपत्राच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1102/2009, 1103/2009**

सौ. शंकुतला भाऊराव गोहत्रे
59 बंडू सोनी परसोडी
नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एम. कोहाट
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. काटोल
बस स्थानकाजवळ ता. काटोल जि. नागपूर

2) श्री पी. एन. मुनाने
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग (स व सु) महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. काटोल
बस स्थानकाजवळ ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका भूमापन अधिकारी काटोल
धंतोली रुईया हायस्कूल समोर ता. काटोल जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा तालुका भूमापन अधिकारी काटोल
धंतोली रुईया हायस्कूल समोर ता. काटोल जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.12.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 1103/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2009 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तालुका भूमापन अधिकारी काटोल यांचेकडे दि. 11.12.08 रोजी मौजा लमधान येथील 42/अ मधील त्यांच्या शेतीच्या मोजणी संबंधाने चार मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने मौजा लमधान प.ह.नं.42/अ तहसिल काटोल जि. नागपूर येथील शेतीच्या मोजणी संबंधात झेरॉक्स प्रती पाहिजे असल्यास रितसर फी चा भरणा करुन मोजणी संबंधाची झेरॉक्स पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.

त्यानंतर विषयांकीत बाबतची माहिती/नकला त्यांनी मागणी केल्याप्रमाणे रक्कम रु. 11/- शासकीय फी ची भरणा इकडील कार्यालयात करुन नकला प्राप्त करुन घेणेस विनंती आहे. सदरची रक्कम तीन हजाराचे आंतील असल्याने कार्यालयात येवून भरणा करावी लागेल असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी खसरा नंबर दिलेला नाही व त्यामुळे अपूर्ण माहिती मुळे खुलासा झाला नाही. प्रकरणामध्ये संबंधित नंबर, गट नंबर मोजणी कमांक दिलेला नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक झालेले नाही. अपीलकर्ता यांनी लमधान येथील 42/अ मधील असे जे म्हटले आहे तो संपूर्ण गावाचा नंबर आहे. त्यानंतर गट नं. 27 मो.नं.272/08 चे प्रकरण आढळलेने अर्जदारास दि.24.11.08 ला नकल घेवून जाणेबाबत कळविले आहे. परंतु त्यानंतर निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणेस विलंब झालेला आहे असेही त्यांनी सांगितले. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तालुका भूमापन अधिकारी काटोल यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून व योग्य त्या फी चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क. 1102/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (स व सु) महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. काटोल यांचेकडे पारंडसिंगा सब स्टेशन वीज महावितरण कंपनी संबंधाने शेतातून रस्त्याची जागा देण्याबाबत करार पत्राबाबत दि. 12.12.08, 18.12.08 व 20.3.09 दिलेल्या तकारीवरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.10. 2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.11.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती पाठविण्यात आलेली दिसून येते. व सदरची माहिती दि. 13. 11.2009 रोजी प्राप्त सुध्दा झालेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये कास्तकाराचे अटी पत्रावर सही न करणे, माहिती पुर्णपणे न देणे, संबंधीताकडून माहिती न घेणे, नियमबाहय वागणूक न देणे अशा प्रकारे अपीलाचे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना वरील कारणाच्या संदर्भात युक्तीवाद केला. परंतु राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारे गुणवत्तेवर तपासणी करुन निर्णय देण्याचे अधिकार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जशी कागदपत्रे आहेत तशी माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु त्यांच्या दि. 12.12.08, 18.12.08 व 20.3.09 च्या अर्जात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क. 1103/2009 अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी गट नं. 27 मो.नं.272/08 ची माहिती योग्य ती फी भरुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपील क. 1102/2009 अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 12.12.08, 18.12.08 व 20.3.09 च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.12.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**